POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३१५ ● मुंबई, बुधवार, १७ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

मुंढेंनी बजावले

जनतेच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही गैरप्रकारांबाबत एफडीए प्रशासनाचे 'शून्य सहनशीलता' धोरण असल्याचं तुकाराम मुंढेंनी अनेकदा अधोरेखित केले आहे. भ्रामक, निकृष्ट दजार्ची किंवा विनापरवाना उत्पादने तयार करणे, साठवणे अथवा विक्री करणे याविरूद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचं मुंढेंनी ठामपणे सांगितलं आहे. एवढ्यावरच न थांबता ग्राहकांना सुरक्षित व दजेर्दार उत्पादने उपलब्ध करून देणे, हे एफडीए प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे मुंढे यांनी आपली भूमिका मांडताना म्हटलं आहे.

मुंढेंचा धडाका सुरुच... मुंबईत एफडीएच्या धाडी, सापडलेल्या गोष्टी पाहून बसेल धक्का

तुमच्या जीवशी खेळ! मुंढेंनी केला 'झिरो टॉलरन्स'चा उल्लेख



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

बेकायदेशीर औषधांविरोधातील कारवाईनंतर आयुक्तपदी असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखालील अन्न व औषध प्रशासनाने आपला मोर्चा भ्रामक दावे करणाऱ्या व विनापरवाना उत्पादन घेणाऱ्या कंपन्यांकडे वळवला आहे. या कंपन्यांच्या ब्यूटी प्रोडक्ट्सवर छापेमारी सुरु करण्यात आली आहे. एफडीए अशा बनावट आणि दर्जा टिकवून न ठेवणाऱ्या ब्यूटी प्रोडक्टविरोधात मोहीम हाती घेतली आहे. मुंबईत दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत एकूण 5.16 लाख रुपयांची ब्यूटी प्रोडक्ट्स, कच्चा माल आणि यंत्रसामग्रीचा साठा जप्त करण्यात आला आहे. हे छापे मुंबईमध्ये दोन महत्त्वाच्या ठिकाणी टाकण्यात आले.

क्रॉफर्ड मार्केटमध्ये धडक कारवाई

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून मुंबईतील प्रसिद्ध क्रॉफर्ड मार्केटमधील ब्युटी सेंटरची तपासणी केली. या धाडीदरम्यान काही सौंदर्यप्रसाधनांवर आवश्यक वैधानिक माहिती नसल्याचे आढळून आले. परवान्याविना औषध आणि सौंदर्यप्रसाधनांचे उत्पादन सुरू असल्याचे आणि विक्रीसाठी साठा ठेवण्यात आल्याचे समोर आल्यानंतर एफडीएच्या पथकाने तात्काळ धडक कारवाई केली आणि यंत्रसामग्रीचा साठा जप्त केला. विविध सौंदर्य प्रसाधनांवर बॅच क्रमांक, परवाना क्रमांक व उत्पादकाची माहिती अपुरी असल्याचे निदर्शनास आले. याशिवाय उत्पादनांवर भ्रामक दावे करण्यात आल्याचे दिसून आले. हे असं करणं कायद्याला धरुन नसल्याने जप्तीची कारवाई करण्यात आली. या कारवाईअंतर्गत 1 लाख 20 हजार 152 रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

कांदिवलीमधून 3 लाख 96 हजार 830 रुपयांचा माल जप्त

केवळ क्रॉफर्ड मार्केट नाही तर कांदिवली पश्चिमेतील रॅडिएन्ट क्रिएशन्सची तपासणी केल्यावर तपासणीदरम्यान आवश्यक परवान्याविना औषधे व सौंदर्यप्रसाधनांचे उत्पादन सुरू असल्याचे उघड झाले. याठिकाणी उत्पादनासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व कच्चा मालही आढळून आला. या कारवाईत 3 लाख 96 हजार 830 रुपयांची औषधे, सौंदर्यप्रसाधने, कच्चा माल व यंत्रसामग्रीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

'मला जाऊ दे,' हवाई दल अधिकाऱ्याच्या पत्नीचं जबरदस्ती धर्मांतर, लैंगिक अत्याचार... व्हिडिओत धक्कादायक सत्य कैद

■डहाणू। प्रतिनिधी,

हवाई दलातील एका कर्मचाऱ्याच्या पत्नीने तिच्या शाळेतील एका जुन्या वर्गमित्रावर आणि त्याच्या साथीदारांवर बलात्कार, ब्लॅकमेलिंग, जादूटोणा तसंच बळजबरीने धर्मांतर केल्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपीसह दोघांना अटक केली आहे. दरम्यान धर्मांतराच्या प्रकरणात कथितरीत्या सहभागी असलेल्या एका मौलवीचा शोध घेण्यासाठी मध्य प्रदेशात एक पथक पाठवण्यात आलं आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं अयाज मदारे आणि त्याचा साथीदार अमीन शेख अशी आहेत.

व्हायरल व्हिडीओ

या प्रकरणात व्हायरल व्हिडीओ एक महत्त्वाचा पुरावा ठरला. व्हिडीओत 24 वर्षीय तरुणी रडताना आणि आरोपी अयाजकडे आपल्याला सोडून देण्यासाठी गयावया करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये पीडिता "छोडो मुझे" (मला सोडून द्या) असं म्हणत असल्याचं ऐकू येत आहे. यादरम्यान अयाज धार्मिक श्लोक म्हणत आणि तिच्यावर वारंवार फुंकर मारत तिचे हात बळजबरीने धरून ठेवतो. ती तरुणी स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. त्या तरुणीचा आरोप आहे की, त्यानंतर तिचं धर्मांतर झाल्याचं जाहीर करण्यात आलं आणि बलात्काराचा प्रयत्न करण्यात आला. पीडितेने केलेल्या आरोपानुसार, अयाज प्लास्टिकच्या बाटलीतून द्रव आणायचा आणि तिच्यावर पिण्यासाठी जबरदस्ती करायचा. तो उर्दूमध्ये काहीतरी बोलायचा आणि तोंडावर फुंकर मारायचा. बलात्कार करण्याआधी तो तिला हे संमोहन आणि काळी जादू असल्याचं तो सांगायचा. व्हिडीओत कथितपणे काळी जादू आणि संमोहन दिसत आहे.

मद्यपानात गुंगीचं औषध, फोटो आणि व्हिडिओ

एफआयआरनुसार, 8 फेब्रुवारी 2025 रोजी एका हॉटेलमध्ये भेट झाली असता अयाजने 24 वर्षीय तरुणीच्या पेयात गुंगीचं औषध मिसळल्याचा आरोप आहे. जेव्हा ती शुद्धीत आली तेव्हा आरोपीने तिचे आक्षेपार्ह फोटो, व्हिडीओ काढल्याचं लक्षात आलं. त्यानंतर, हे व्हिडिओ तिच्या पतीला पाठवण्याची आणि सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देत त्याने तिला ब्लॅकमेल केलं. पीडितेने आरोप केला आहे की, तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आले. तसं तिच्याकडून सुमारे 4 लाख रुपये उकळण्यात आले.



जबरदस्ती धर्मांतर, निकाह

तक्रारीत नमूद करण्यात आल्यानुसार, 31 मे रोजी मदारे आणि त्याच्या साथीदाराने तरुणीला बळजबरीने कळमेश्वरला नेले. तिथे, तिसरा आरोपी, जो मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील तामिया गावातील हजरत मौलाना होता, त्याने धार्मिक विधी केले आणि धर्मांतरासाठी तिला 'कबूल है' म्हणण्यास भाग पाडलं. हे सर्व आपल्या इच्छेविरोधात करण्यात आल्याचा तरुणीचा आरोप आहे. विधीनंतर, मौलानाने तिचं इस्लाममध्ये धर्मांतर झाल्याचं जाहीर केलं आणि अयाजसोबत तिचा 'निकाह' (विवाह) संपन्न झाल्याचीही घोषणा केली. तिला बळजबरीने मांस खाण्यास आणि 'कलमा' म्हणण्यास भाग पाडण्यात आले. त्यानंतर, त्या गटाने तिला एका हॉटेलमध्ये नेले, जिथे अयाजने तिच्यावर पुन्हा बलात्कार केल्याचा आरोप आहे. आरोपी तिच्या घरी येऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करत राहिले, असाही आरोप तिने केला आहे.

पोलिसांची कारवाई

पोलिसांनी बलात्कार, वारंवार होणारं लैंगिक शोषण, खंडणी, ब्लॅकमेलिंग आणि बळजबरीने धर्मांतर या आरोपांसह जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत कलमं लागू केली आहेत. धर्मांतर घडवून आणल्याचा आरोप असलेल्या मौलवीचा शोध घेण्यासाठी नागपूर पोलिसांचं एक पथक रवाना झालं आहे. डीसीपी सुरेश रेड्डी यांनी सांगितलं आहे की, "आपल्या तक्रारीत महिलेने बलात्कार, खंडणी, धर्मांतर आणि जादूटोणा यासंदर्भात आरोप केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. हा पुरावा अत्यंत महत्त्वाचा ठरेल. धर्मांतर घडवून आणणाऱ्या मौलवीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक दुसऱ्या राज्यात गेले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे."

कृष्णा नदीतील पाण्याचा रंग बदलला, संपूर्ण नदीत हिरव्या रंगाचे पाणी, 10 गावातील 500 नागरिक आजारी



■सातारा। प्रतिनिधी,

कराड तालुक्यातून वाहणाऱ्या कृष्णा नदीच्या पाण्याबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. नदीतील पाण्याचा रंग अचानक हिरवा झाल्याने नागरिक घाबरले असून, प्रशासनाचीही धावपळ सुरु आहे. पाणी दूषित झाले असून या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. कराड तालुक्यातील सुमारे दहा गावांतील 500 हून अधिक नागरिक आजारी पडल्याची माहिती समोर आली आहे.

प्रदूषण नियंत्रण महामंडळाने या पाण्याचे नमुने तपासल्यानंतर ते पिण्यास अयोग्य असल्याचं स्पष्ट करत नागरिकांना हे पाणी पिण्यास किंवा घरगुती वापरासाठी वापरू नये, असं आवाहन केलं आहे. दरम्यान नेमकं प्रदूषण कशामुळे झालं याबाबत वेगवेगळे तर्क लावले जात आहेत. या नदीचा आजूबाजूला असणाऱ्या गावांसाठी नवीन पाण्याचे स्रोत शोधण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाचा वतीने देण्यात आले आहेत.

कृष्णा नदीतून पाणी उपशावर बंदी

मान्सून लांबल्याने,कृष्णा नदी काठावर पाणी टंचाईचे ढग आहेत. कृष्णा नदीतून पाणी उपसावर जलसंपदा विभागाकडून बंदीचे आदेश देण्यात आले आहेत. शेतीसाठी पाणी उपसा करण्यावरीस बंदी लागू झाली आहे. खासगी व औद्योगिक पाणी उपशावर देखील बंदी घालण्यात आली आहे. पाणी उपसा केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा जलसंपदा विभागाकडून देण्यात आला आहे. केवळ पिण्याच्या पाण्यासाठी उपसा करण्याला परवानगी आहे. कोयना धरणातील कमी झालेले पाणीसाठा आणि नदीतील पाण्याची उपलब्धता यामुळे जलसंपदा विभागाकडून हा निर्णय घेण्यात आला. 15 जूनपासून पुढील आदेशपर्यंत कृष्णा नदीतील शेती व इतर गोष्टीसाठी पाणी उपशावर बंदी राहणार आहे.

धरणांतील पाणी तीन महिने फक्त पिण्यासाठी

अपुऱ्या पर्जन्यमानाचा अंदाज आणि पाणीटंचाई यांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने आज महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. राज्यातील धरणांमध्ये असलेला पाणीसाठा पुढील तीन महिने फक्त पिण्यासाठीच वापरला जावा, सिंचनासाठी धरणातील पाणी सोडणे बंद करा, असे निर्देश शासनाने दिले आहेत. बरोबरच बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगरात रेशनिंगच्या काळ्याबाजाराचा पर्दाफाश

गरोदर मातांसाठीच्या पोषण आहारावर माफियांचा डल्ला

रेशनिंगच्या काळाबाजारातील मुख्य आरोपी इस्लाम पाटीर्चा कलिम कुरेशी हा आहे. तो सध्या फरार आहे. याच कलीम कुरेशीच्या माणसांनी महापालिका निवडणुकीदरम्यान इम्तियाज जलीलांवर हल्ला केल्याचा आरोप आहे

■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगरात रेशनिंगच्या काळ्याबाजाराचा पर्दाफाश झालाय. किराडपुरातील एका गोदामात साठवून ठेवलेलं रेशनिंगचं धान्य पोलिसांनी छापा टाकत जप्त केलंय. गरोदर मातांसाठी दिला जाणारा पोषण आहारही या माफियांच्या गोदामात सापडलाय. या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार इस्लाम पक्षात असलेला माजी नगरसेवक असल्याचे पुढं आले आहे... त्यामुळं संभाजीनगरचं राजकारणही तापलंय.

छत्रपती संभाजीनगरात रेशनिंगचा काळाबाजार

छत्रपती संभाजीनगरच्या किराडपुरा भागातून पोलिसांनी धान्याचा मोठा साठा जप्त केलाय... हे सर्व धान्य रेशनिंगचं आहे...या सोबतच इथं गरोदर माता आणि बालकांसाठी दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराची पाकिटेही सापडली आहेत... छाप्यादरम्यान पोलिसांनी शेकडो धान्याची पोती जप्त केलीत...याची किंमत जवळपास 17 लाख रुपये इतकी आहे... पोषण आहाराची एक किलोची पाकिटे फोडून ती गोण्यांमध्ये भरत असतानाच पोलिसांनी ही धाड टाकलीये



रेशनिंगच्या काळाबाजारातील मुख्य आरोपी इस्लाम पार्टीचा कलिम कुरेशी हा आहे....तो सध्या फरार आहे...याच कलीम कुरेशीच्या माणसांनी महापालिका निवडणुकीदरम्यान इम्तियाज जलीलांवर हल्ला केल्याचा आरोप आहे...तसेच त्याच्यावर आधीही रॉकेट, गुटखा तस्करीचे गुन्हे दाखल आहेत...सत्ताधाऱ्यांनी कलिमवर मकोका अंतर्गत कारवाई करणार असल्याचं सांगितलंय...तर कलिम कुरेशीला अतुल सावेंचा पाठिंबा असल्याचा आरोप अंबादास दानवेंनी केलाय. यावरून उबाठा नेते अंबादास दानवे यांनी थेट ओबीसी मंत्री अतुल सावेवर हल्लाबोल केलाय, कलीम कुरेशी हा अतुल सावे यांचा माणूस आहे कुरेशीला अतुल सावे सांभाळतात आणि मी हे पुराव्यानिशी सिद्ध करू शकतो असा अंबादास म्हणाले त्यामुळे कुरेशीवर कारवाई करताना ही पाळमुळेही खोदून काढण्याची गरज अंबादास दानवे यांनी व्यक्त केली.

आता पोलिसांच्या या कारवाईनंतर राजकारण सुरू झाले आहे नेते एकमेकांवर आरोप करत आहे मात्र या सगळ्यात गोरगरिबांचा अन्न पळवणारी ही टोळी ही आता पोलिसांकडून उघड झाली आहे, त्यामुळे राजकारण सुरू राहील मात्र या गोर गरिबांच्या ताटातील अन्न पळवणाऱ्या लोकांवरही कठोर कारवाई करण्याची तितकीच गरज आहे.

आरोपी कलिम कुरेशीच्या राजकीय कनेक्शनमुळे आरोपांचं राजकारण सुरु झालंय... हे राजकारण सुरूच राहील पण गोरगरिबांच्या ताटातील अन्न पळवणा-या लोकांवरही तातडीने कठोर कारवाई होणे गरजेचं आहे...त्याशिवाय इतर गुन्हेगारांना चाप बसणार नाही.

51.54 लाखांचा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू साठा जप्त

■डहाणू। प्रतिनिधी,

तालुक्यातील कासा पोलीस ठाणे पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने केलेल्या कारवाईत गुजरातमधून महाराष्ट्रात आणला जाणारा तब्बल 51 लाख 54 हजार 40 रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 15 जून रोजी पहाटे 12.40 वाजण्याच्या सुमारास गुजरातमधील वलसाड येथून उधवा-कासा मार्गे भिवंडीकडे जार्णाया टेम्पोबाबत पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार कासा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने डहाणू तालुक्यातील वाघाडी गाव हद्दीत सापळा रचून वाहनाची तपासणी केली.

तपासणीदरम्यान वाहनातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पानमसाला आणि व्ही-1 तंबाखूचा साठा आढळून आला. जप्त मालामध्ये विविध प्रकारच्या पॅकिंगमधील पानमसाला तसेच व्ही-1 तंबाखूच्या गोण्यांचा समावेश आहे. या मालाची किंमत सुमारे 30 लाख रुपयांहून अधिक असून वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टेम्पो मिळून एकूण 51 लाख



54 हजार 40 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी चालक शहजाद महम्मद याकुब शहा (वय 28, रा. नवसारी, गुजरात) याच्याविरुद्ध कासा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 117/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाठक करीत आहेत. प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या तस्करीविरोधात अशाच कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यावर दारू पिऊन धिंगाणा... कर्नाटकातील 5 पर्यटकांवर गुन्हा दाखल

■कोल्हापूर। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील गड किल्ले हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे, शौर्याचे आणि एतिहासाचे साक्षीदार आहेत. महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे संवर्धण करण्यासह त्यांचे पावित्र्य राख्यासाठी देखील प्रयत्न केले जातात. अशा प्रकारचे सूचना फलक देखील लावले जातात. असे असताना अनेक जण गड किल्ल्यांवर दारु पिऊन धिंगाणा घालतात. असे असताना महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यावर दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या कर्नाटकातील पाच पर्यटकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोल्हापूरच्या ऐतिहासिक विशाळगडावर धक्कादायक प्रकार घडवला आहे. उघड्यावर मद्यप्राशन करून हुल्लडबाजी करणाऱ्या कर्नाटकातील पाच पर्यटकांवर शाहूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओची दखल घेत पोलिसांनी ही कारवाई केली. कर्नाटकातील पाच पर्यटक ऐतिहासिक विशाळगडावर फिरण्यासाठी आले होते. 14 जून 2026 रोजी सायंकाळी विशाळगडावरील मुंडा दरवाजा परिसरात हे पर्यटक दारू पिऊन गोंधळ घालत असल्याचे समोर आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणात गंगाधर मारुती दोडमणी, मुथु सैदु बैलंगली, मल्लाप्पा सदाशिव शिंदे, चाणकेश्वर लिंगाप्पा बागी आणि आनंद लक्ष्मण बागी या पाच जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. हे सर्वजण मुधोळ, जिल्हा बागलकोट, कर्नाटक येथील रहिवासी आहेत. पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनुने करत आहेत. ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे पावित्र्य भंग करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.



हुंड्यासाठी गर्भवती महिलेसोबत नको ते केलं... गरम पाण्याने हात जाळत सासरच्यांनी केलं सुनेचं 'टक्कल'

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याणमधील वालधुनी परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. हुंड्यासाठी सासरच्या मंडळींनी छळाची परिसीमा गाठत एका गर्भवती विवाहितेचे चक्क टक्कल केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अमानुष छळातून कशीबशी सुटका करून घेत पीडित महिला सासरहून पळून माहेरी आली असून, सध्या तिच्यावर उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण कल्याण आणि उल्हासनगर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

लग्नानंतर अवघ्या महिन्याभरातच छळ सुरू

मिळालेल्या माहितीनुसार, अफसाना अन्सारी असे या पीडित विवाहितेचे नाव असून ती मूळची उल्हासनगरची रहिवासी आहे. नोव्हेंबर 2025 मध्ये तिचा विवाह कल्याणच्या वालधुनी परिसरात राहणाऱ्या समीर अन्सारी याच्यासोबत झाला होता. लग्न करताना मुलीच्या माहेरच्यांनी आपली हुंडा देण्याची परिस्थिती नसल्याचे सासरच्यांना आधीच स्पष्ट केले होते. मात्र, तरीही लग्न पार पडल्यानंतर अवघ्या महिन्याभरातच सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी अफसानाचा छळ करण्यास सुरुवात केली.

कल्याणमधील संतापजनक घटना

गरम पाण्याने हात जाळले, गर्भवती असतानाही ठेवले उपाशी

पीडित महिला गर्भवती असतानाही तिला सासरच्यांकडून जेवण दिले जात नव्हते. घरातील शिल्लक जेवण मुद्दाम फ्रिजमध्ये कुलूप लावून ठेवले जायचे. अमानुष मारहाण करणे, कोणतीच वस्तू किंवा वैद्यकीय उपचारांसाठी पैसे न देणे, इतकेच नव्हे तर गरम पाण्याने तिचे हात जाळण्याचे क्रूर कृत्यही सासरच्यांनी केले. माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीब असल्यामुळे पीडित महिलेने हा सगळा त्रास गुपचूप सहन केला.

'डोक्यात उवा झाल्या'चे कारण सांगून केले टक्कल

सासरच्यांचा छळ एवढ्यावरच थांबला नाही, तर 7 जून रोजी क्रौयार्चा कळस गाठला गेला. 'तुज्या डोक्यात उवा झाल्या आहेत', असे खोटे कारण पुढे करत सासरच्यांनी जबरदस्तीने अफसानाचे टक्कल केले. हा अपमान आणि अमानुष छळ असह्य झाल्यामुळे महिलेने सासरच्यांच्या तावडीतून कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली आणि ती घरातून पळून थेट आपल्या बहिणीकडे गेली. तेथून तिने आपला भाऊ नीर हसन अन्सारी याला फोन करून संपूर्ण आपबिती सांगितली. भावाने तातडीने बहिणीची ढासळलेली प्रकृती पाहून तिला उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

कठोर कारवाईची मागणी

क्रौयार्ची सर्व परिसीमा ओलांडणाऱ्या या गंभीर प्रकरणाची आता थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी आणि पीडित महिलेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सामाजिक स्तरातून होत आहे. सासरच्या नराधमांवर अतिशय कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कुटुंबाने केली आहे. याप्रकरणी सध्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

एका अधुऱ्या कायद्यामुळे नराधमांना 'शक्ती'



महाराष्ट्रात दर ५३ मिनिटांनी एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव आहे. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे, तर अधुऱ्या शक्ती कायद्यामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळे ही.

पुण्याच्या नसरापूरमध्ये साडेतीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार होऊन तिची हत्या झाली. तिच्यानंतर पर्वतीत नऊ वर्षाच्या मुलीवर आजोबाने हात टाकला. चाकणमध्येही पुन्हा तशीच घटना. हे महाराष्ट्र दिनाच्याच आठवड्यातले चित्र आहे. पण या चित्राच्या पार्श्वभूमीत एक काळोखा कोपरा आहे, जिथे राजकारण चालू आहे. थंड, निगरगट्ट, स्वार्थी राजकारण. शक्ती कायदा राजकारणात अडकला. २०२१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेने शक्ती कायदा एकमताने मंजूर केला. बलात्कार, बालकांवरील अत्याचार, ॲसिड हल्ले यांसाठी २१ दिवसांत चौकशी, खटला आणि शिक्षा हा कायद्याचा गाभा होता. आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर बनवलेला हा कायदा देशातील सर्वाधिक कठोर ठरला असता. मग हा कायदा कुठे आहे आज? केंद्र सरकारच्या धूळखात पडलेल्या फाइलींमध्ये. तीन वर्षांहून अधिक काळ. फौजदारी कायदा हा समवर्ती सूचीत येतो. त्यामुळे राज्याने पारित केलेल्या अशा कायद्यांना केंद्राची अंतिम मंजुरी लागते हे घटनात्मक सत्य आहे. पण घटनेने ही प्रक्रिया अडवण्यासाठी दिलेली नाही, ती समन्वयासाठी दिली आहे. केंद्राने शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? एकही तांत्रिक उत्तर आजपर्यंत दिले गेले नाही. कारण अडथळा तांत्रिक नव्हता. जो अडथळा होता तो राजकीय होता. महाविकास आघाडी सरकारने बनवलेला कायदा केंद्रातील भाजपने मंजूर करायचा हे त्यांना रुचले नाही. एखाद्या विरोधी सरकारच्या यशाला मुद्रांकन द्यायचे नाही, हा पक्षाचा अलिखित नियम. या नियमाची किंमत नसरापूरच्या त्या चिमुरडीने जीव देऊन चुकवली. हे आकलन कठोर वाटते का? तर विचार करा, आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायदा केंद्राने किती वेळात मंजूर केला होता? त्या राज्यात भाजपशी मैत्रीपूर्ण सरकार होते. महाराष्ट्रात शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी असलेले सरकार होते. हा योगायोग नाही. हे राजकीय गणित आहे. हे गणित सुटले तेव्हा काय झाले? महाराष्ट्रात सत्तांतर झाले, महाविकास आघाडी गेली, महायुतीचे सरकार आले आणि भाजपचा मुख्यमंत्री आला. आता शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? उत्तर शून्य असायला हवे होते. पण तरीही कायदा लटकतच राहिला. तेव्हा बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाला, राज्य पेटले, पुन्हा आश्वासने दिली. मग २०२५ मध्ये एक नवे 'सुधारित शक्ती विधेयक' आले. भारतीय न्याय संहितेत फेरफार करत. हे विधेयक म्हणजे काय होते? मूळ शक्ती कायद्याची सावली. त्यातील दोन तरतुदी डिजिटल छळाविरोधात आणि ॲसिड हल्ला पीडितेच्या गोपनीयतेसाठी इतक्याच घेतल्या. बाकी कठोर तरतुदी, २१ दिवसांची वेळमयार्दा, जलदगती यंत्रणा हे सगळे भारतीय न्याय संहितेमध्ये आधीच आहे असे सांगून सोडण्यात आले. पण जर भारतीय न्याय संहितेत पुरेशा तरतुदी आहेत, तर नसरापूरमध्ये न्याय का मिळत नाही? जर फास्ट ट्रॅक कोर्ट आहे, तर पुणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहा हजारांहून अधिक पोक्सो प्रकरणे प्रलंबित का होती? उत्तर साधे आहे. कायदा असणे आणि कायदा चालवणे यात फरक आहे. हा फरक दूर करण्याची इच्छाशक्ती या सरकारकडे नाही. नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वी दोनदा तत्सम गुन्ह्यांत अटक झालेला होता. दोन्ही वेळा पुराव्याअभावी सुटला. या माणसाला तिसऱ्यांदा संधी मिळाली ती कशामुळे? तपासाच्या सुमार दर्जामुळे, न्यायालयीन विलंबामुळे आणि पीडितांना वेळेत न्याय न मिळाल्यामुळे. हे तिन्ही प्रश्न शक्ती कायद्याच्या तरतुदींनी सोडवले असते. आता सत्ताधारी म्हणतील की, भारतीय न्यायसंहितेमध्ये तरतुदी आहेत, पोक्सो आहे, एसआयटी स्थापन केली आहे. पण हे सगळे घटना घडल्यानंतर. प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे? पूर्वसावधगिरी कुठे आहे? सत्य हे आहे की, या सरकारला घटनेनंतर उद्रेक आवरण्यात रस आहे, प्रश्न सोडवण्यात नाही. एसआयटी हे संताप झाकणारे झाकण आहे, उपाय नाही. जमाव रस्त्यावर उतरतो, पोलीस स्टेशनसमोर जमतो, आरोपीला आमच्या स्वाधीन करा असे ओरडतो. हे दृश्य लोकशाहीसाठी धोकादायक आहे. या धोक्याचे मूळ कारण जनतेत नाही. जेव्हा व्यवस्था न्याय देत नाही, तेव्हा माणूस न्याय विकत घेण्याचा किंवा स्वतः करण्याचा प्रयत्न करतो. हा समाजशास्त्राचा नियम आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना जबाबदार धरायचे असेल तर ते शक्ती कायदा अडवणाऱ्यांना धरावे लागेल. आजपर्यंत महाराष्ट्रात एक जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या सोळा महिन्यांत ९३ हजार ३९० पोक्सो गुन्हे दाखल झाले. दर ५३ मिनिटांनी एक अत्याचार होतो. ही आकडेवारी पाहून केवळ गुन्हेगारांना दोष देता येणार नाही. ही आकडेवारी जी व्यवस्था कायदे बनवते, ते अडवते, त्यांची अंमलबजावणी करत नाही आणि प्रत्येक घटनेनंतर केवळ निषेधाचे नाटक करते त्यांनाही दोषी धरते. नसरापूरची चिमुरडी गेली. तिला परत आणणे कोणाला शक्य नाही. पण पुढची नसरापूर टाळणे शक्य आहे. जर इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे. अन्यथा बालकांच्या जीवाचे रक्षण करण्याऐवजी सरकार राजकीय श्रेयाच्या लढाईत मग्न राहिले, तर त्याची इतिहासात नोंद होईल. एसआयटी स्थापन होते, निषेध होतो, आश्वासने दिली जातात, पण दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव बदलत नाही. शक्ती कायद्याचे उदाहरण सांगते की, महाराष्ट्रात राजकीय इच्छाशक्ती असेल तर कायदे बनतात, पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांना राजकारणाची चाळणी लागते. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे तर एका अधुऱ्या कायद्यामुळे, एका प्रलंबित न्यायामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

रक्तरंजित संघर्षाची चार वर्षे, युद्धाचे सावट कायम



चार वर्षांपासून सुरू असलेल्या रक्तरंजित संघर्षामुळे संबंधित प्रदेशात मोठ्या प्रमाणावर मानवी, आर्थिक आणि सामाजिक हानी झाली आहे. हजारो लोकांचा मृत्यू झाला असून लाखो नागरिक विस्थापित झाले आहेत. शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले; परंतु संघर्ष पूर्णपणे थांबलेला नाही. युद्धामुळे पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत आणि सामान्य जनजीवनावर गंभीर परिणाम झाला आहे. सध्या संघर्षाची तीव्रता काही प्रमाणात कमी-जास्त होत असली तरी युद्धाचे सावट अजूनही कायम आहे आणि दीर्घकालीन शांततेचा मार्ग अनिश्चित दिसत आहे.

जगातील युद्धे आज पूर्वीपेक्षा अधिक घातक, अधिक खर्चिक आणि अधिक अनिश्चित झाली आहेत. २०२१ ते २०२४ या कालावधीत गोळ्या, बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांमुळे सुमारे ७.५ लाख लोकांचा मृत्यू झाला. युद्धांमुळे निर्माण होणारी उपासमार, रोगराई, विस्थापन आणि इतर अप्रत्यक्ष परिणाम यांचाही विचार केला, तर हा आकडा आणखी मोठा ठरतो. शीतयुद्ध संपल्यानंतरचा हा चार वर्षांचा कालखंड सर्वाधिक रक्तरंजित मानला जातो. मात्र, एवढ्या प्रचंड मानवी आणि आर्थिक हानीनंतरही कोणत्याही पक्षाला स्पष्ट व निर्णायक विजय मिळालेला दिसत नाही. याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे रशियाने युक्रेनवर केलेले आक्रमण. रशियाला झटपट विजयाची अपेक्षा होती; परंतु युद्ध दीर्घकाळ लांबल्याने ते राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासाठी एका दलदलीसारखे ठरले. त्याचप्रमाणे इराणविरोधातील अमेरिकेच्या कारवायांनाही अपेक्षित यश मिळाले नाही. हे संघर्ष आधुनिक युद्धाचे बदलते स्वरूप, त्यातील वाढती गुंतागुंत आणि विजयाच्या पारंपरिक संकल्पनांवर उभे राहिलेले प्रश्न अधोरेखित करतात. युद्धाच्या स्वरूपात सर्वात मोठा बदल तंत्रज्ञानामुळे झाला आहे.

आज उपग्रह, सेन्सर्स आणि कमी खर्चातील ड्रोन यांच्या साहाय्याने सैनिकांच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवणे शक्य झाले आहे. त्यामुळे रणांगणावर मोठ्या सैन्यदलांची हालचाल पूर्वीपेक्षा अधिक धोकादायक ठरते. सैनिकांना स्वतःचे संरक्षण करण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागत आहे. युक्रेनमधील विस्तारित किल झोन हे त्याचे उदाहरण आहे.

तेथील सैनिक आता लहान-लहान गटांमध्ये पुढे सरकतात, तर जखमी आणि मृत सैनिकांना बाहेर काढण्यासाठी रोबोट्सचा वापर केला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, शत्रूच्या कमकुवत भागावर अचानक हल्ला करून निर्णायक आघाडी मिळवण्याची पारंपरिक युद्धनीती आता पूर्वीसारखी प्रभावी राहिलेली नाही. दुसरा मोठा बदल कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)मुळे घडला आहे. एआयमुळे प्रचंड प्रमाणातील माहितीचे अतिशय वेगाने विश्लेषण करणे शक्य झाले आहे. उपग्रह चित्रे, ड्रोनद्वारे मिळणारा डेटा आणि रणांगणावरील विविध सेन्सर्सकडून येणारी माहिती एकत्रित करून शत्रूची स्थिती, हालचाली आणि संभाव्य रणनीती यांचा अंदाज अधिक अचूकपणे लावता येतो. त्यामुळे निर्णयप्रक्रिया जलद होत असून लक्ष्य निवडणे, संसाधनांचे नियोजन करणे आणि हल्ल्यांचे समन्वय साधणे अधिक प्रभावी बनले आहे. भविष्यात स्वायत्त शस्त्रप्रणाली, एआय-आधारित ड्रोन आणि रोबोटिक यंत्रणा युद्धातील मानवी भूमिकेत आणखी बदल घडवू शकतात. त्यामुळे आधुनिक युद्ध हे केवळ सैनिकांच्या संख्येवर नव्हे, तर माहिती, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापरावर अधिक अवलंबून होत चालले आहे.

एआय-आधारित प्रणाली आता लक्ष्य शोधणे आणि त्यावर अचूक हल्ले करण्यासाठी सैन्यदलांना मोठी मदत करत आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणविरोधातील कारवायांमध्ये या तंत्रज्ञानाची क्षमता अधोरेखित केली आहे. मात्र, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही इराणला माघार घ्यायला भाग पाडण्यात यश आलेले नाही. उलट, इराणने ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले सुरूच ठेवले असून आपल्या अणू कार्यक्रमाबाबतची भूमिका देखील कायम ठेवली आहे. यावरून एक महत्त्वाची बाब स्पष्ट होते, की तांत्रिक श्रेष्ठता म्हणजेच राजकीय किंवा लष्करी विजयाची हमी नव्हे. तिसरी आणि तितकीच गंभीर चिंता म्हणजे युद्धनियम आणि मानवी मूल्यांवर वाढत असलेला दबाव. युक्रेनपासून गाझापर्यंत अनेक संघर्षक्षेत्रांमध्ये नागरी लोकसंख्येवर हल्ले, रुग्णालयांसारख्या संरक्षित ठिकाणांना लक्ष्य केल्याचे आरोप आणि आंतरराष्ट्रीय युद्धनियमांच्या उल्लंघनाच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. या सर्व घडामोडी एक महत्त्वाचा संदेश देतात.

युद्ध सुरू करणे कदाचित पूर्वीपेक्षा सोपे झाले असेल; परंतु ते जिंकणे आणि त्याचा शेवट घडवून आणणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे तुलनेने कमकुवत राष्ट्रांनाही प्रभावी प्रतिकार करण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. परिणामी, भविष्यातील युद्धे अधिक दीर्घकालीन, अधिक खर्चिक आणि अधिक विनाशकारी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. युद्धाचे स्वरूप गेल्या काही दशकांत तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणात बदलले. आधुनिक युद्धात सेन्सर्स, उपग्रह आणि ड्रोन यांसारख्या निरीक्षण साधनांचा व्यापक वापर होत असल्याने रणांगणातील हालचाली गुप्त ठेवणे अधिक कठीण झाले आहे. परिणामी, सैनिकांच्या सुरक्षिततेसमोरील धोके वाढले असून शत्रूच्या हालचालींची माहिती अधिक वेगाने आणि अचूकपणे मिळू लागली आहे. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) युद्धाच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत आहे. एआयच्या साहाय्याने लक्ष्य शोधणे, माहितीचे विश्लेषण करणे आणि अचूक हल्ल्यांचे नियोजन करणे अधिक प्रभावी झाले आहे. त्यामुळे युद्ध अधिक वेगवान, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि परिणामकारक बनले आहे. मात्र, या तांत्रिक प्रगतीसोबत काही गंभीर आव्हानेही समोर आली आहेत. अनेक संघर्षांमध्ये नागरिकांवरील हल्ले, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि युद्धनियमांचे वाढते उल्लंघन दिसून येत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे, मानवी मूल्ये आणि युद्धातील नैतिकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत असून जागतिक समुदायासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत.

नागरिकांवरील हल्ले आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे आणि मूल्यांवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तंत्रज्ञानाचा प्रसार अतिशय वेगाने होत आहे. लेबनॉनमध्ये इस्रायली सैन्याला आता युक्रेनमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रकारच्या ड्रोनचा सामना करावा लागत आहे. खाडी युद्धातील इराकच्या स्कड क्षेपणास्त्रांच्या तुलनेत इराणची क्षेपणास्त्रे अधिक अचूक मानली जातात. भविष्यात चीनने तैवानवर हल्ला केल्यास त्याच्या सैन्यालाही मोठ्या प्रमाणातील ड्रोन हल्ल्यांचा सामना करावा लागू शकतो.

नव्या पिढीतील ड्रोनमुळे हवाई वर्चस्व टिकवणे आणि सैनिकांचे संरक्षण करणे अधिक आव्हानात्मक झाले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधातील संघर्ष लहान आणि जलद स्वरूपाचा असेल, असा अंदाज व्यक्त केला होता. मात्र प्रत्यक्षात हा संघर्ष अमेरिकेच्या महागड्या शस्त्रसाठ्याचा मोठ्या प्रमाणावर वापर आणि आर्थिक नुकसान सहन करण्याच्या मर्यादांशी संबंधित आव्हानांमध्ये रूपांतरित झाला. अफगाणिस्तान आणि व्हिएतनाममधील युद्धांमध्ये तुलनेने कमकुवत पक्षांनी स्वतःच्या भूमीवर लढत दिल्यामुळे वरचष्मा मिळवला होता; परंतु आज ड्रोन आणि क्षेपणास्त्र तंत्रज्ञानामुळे लहान किंवा कमकुवत देशांनाही दूरवरून प्रभावी प्रत्युत्तर देण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. त्यामुळे आधुनिक युद्धांमध्ये शक्तीचे पारंपरिक समीकरण मोठ्या प्रमाणात बदलत आहे.

दादांनंतर वहिनीच हायकमांड

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचा 27 वा वर्धापन दिन मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात नुकताच पार पडला. या सोहळ्यात पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे भाषण जोरदार झाले. पक्षात राहूनच पक्षाला वेठीस धरणाऱ्या नेत्यांना सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणातून चांगलेच खडेबोल सुनावले. पक्षात शिस्तभंग, गटबाजी किंवा पक्षाची प्रतिमा मलिन करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला यापुढे थारा दिला जाणार नाही. पक्षात कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप सहन करणार नाही, असे म्हणत त्यांनी पक्षाची सूत्रे आपल्या हाती असून पक्षनेतृत्वाचा निर्णय मान्य करावाच लागेल, असा संदेश दिला. नेत्यांनी पक्षात किती वर्षे काम केले यापेक्षा पक्षावाढीसाठी काय योगदान दिले? एवढी वर्षे पक्षात राहून पक्ष मोठा केला का स्वतःच मोठे होण्याचा प्रयत्न केला? याचेदेखील परीक्षण केले जाईल, असे म्हणत त्यांनी जुन्या जाणत्या नेत्यांना पक्षात रहायचे असेल तर पदाची अपेक्षा न ठेवता काम करण्यावाचून पर्याय नाही, असा अप्रत्यक्ष इशारा दिला. पक्षाची सूत्रे हाती घेतल्यापासून सुनेत्रा पवार यांनी पहिल्यांदाच असे रोखठोक भाषण केल्याने त्यांच्यात अजितदादांच्या कणखरपणाची झलक दिसून आली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविना पार पडलेला पक्षाचा हा पहिलाच वर्धापन दिन सोहळा. या वर्धापन दिनाला पक्षाची तमाम नेतेमंडळी हजर असली, तरी सभागृहात दादांची उणीव प्रकर्षाने जाणवत होती. म्हणूनच सभागृहातील व्यासपीठावर त्यांच्या नावाची एक रिकामी खुर्ची उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. सत्तेत असो वा नसो अजित पवार सतत चर्चेत असलेले व्यक्तिमत्व होते. रांगड्या स्वभावाच्या अजितदादांना गावखेड्यातील प्रश्नांपासून ते शहरी नागरी समस्यांची उत्तम जाण होती, प्रशासनावर विलक्षण पकड होती. त्यामुळे ते एक लोकप्रिय, अनुभवसंपन्न आणि जनहिताच्या प्रश्नाला प्राधान्य देणारे नेते होते. समोरच्याचे काम होत असेल तर करणारच आणि होत नसेल तर त्याला नाही म्हणून तोंडावर सांगणारा त्यांच्यासारखा परखड व्यक्तिमत्वाचा दुसरा नेता दुसरा नव्हता. धारदार आवाजाच्या अजितदादांचे सडेतोड बोलणे आणि त्यांची भाषणशैली सामान्य कार्यकर्त्यांच्या काळजाचा ठाव घेणारी होती. प्रत्येक कार्यकर्त्याशी त्यांचा वन टू वन संवाद असायचा. अशा रोखठोक स्वभावाच्या अजितदादांचा पक्षातील सर्वच नेत्यांवर वचक होता. मात्र, अजितदादांच्या निधनानंतर हा वचक एकाएकी नाहीसा झाल्याचे जाणवत होते. मोठ्या साहेबांचा हात सोडून पक्षातील नव्याजुन्या नेतेमंडळींनी अजितदादांना साथ दिली होती. परंतु त्यांच्या जाण्याने या सर्वच नेत्यांना आपल्या भविष्याची चिंता वाटू लागली. हे तेच नेते होते ज्यांनी अजितदादांना शरद पवारांसारख्या वटवृक्षाच्या छत्रछायेतून बाहेर काढत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व शोधायला प्रवृत्त केले होते. पक्ष विभाजनानंतर या सर्वच नेत्यांना सत्तेची गोड फळे चाखता आली. परंतु अजितदादांच्या निधनाने सत्तापदांच्या फळांची टोपली आपल्या हाती राहते की नाही असे प्रश्न उपस्थित झाले. पक्ष टिकतो की नाही इथपासून ते दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार की नाही? अशा प्रश्नांनी राष्ट्रवादीचे नेते आणि कार्यकर्त्यांना गोंधळात टाकले. दोन्ही गटांचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असताना अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. यानंतर पक्षाच्या अध्यक्षाही झाल्या. परंतु, पक्षातील काही ज्येष्ठ नेतेच पक्षाचा गाडा हाकत असल्याची, महत्त्वाचे सर्व निर्णय घेत असल्याची चर्चा काही दिवसांपर्यंत दबक्या आवाजात सुरू होती. त्यातच अजित पवारांचे चिरंजीव पार्थ आणि जय यांचे वरिष्ठ नेत्यांसोबतच्या खडाखडीचे किस्से बाहेर येत होते. तर कधी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या यादीत ज्येष्ठ नेत्यांच्या नावापुढे त्यांचे पद नमूद नसणे, पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकांना ज्येष्ठ नेते गैरहजर असणे यामुळे मागच्या काही दिवसांत शंकाकुशंकांना उधाण आले होते. कधीकाळी राजा गेल्यानंतर त्यांच्या वारसाला गादीवर बसवून इतर सरदार, मंत्रीसंत्री राज्यकारभार हाकायचे, त्यांच्या नावाने लढाया लढायचे आणि हाती येणाऱ्या खजिन्यावरही ताव मारायचे. असे सारेकाही घडत असताना आपल्या हाती एकवटलेल्या सत्तेला कुणीही नख लावू नये याची काळजीही ते घ्यायचे. यासाठी तख्तावर बसलेल्या वारसाचे पंख छाटण्यापासून त्याच्याविरुद्ध कटकारस्थान रचण्यातही ते मागेपुढे पाहायचे नाही. तसेच काहीसे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडते आहे की काय? पक्षाची सूत्रे हाती घेण्यावरुन पक्षांतर्गत धुसफूसीच्या चर्चा या ना त्या बहाण्याने बाहेर येत होत्या. त्या सर्यांना सुनेत्रा पवार यांच्या एका भाषणाने लगाम लावला आहे. देशातल्या प्रादेशिक पक्षांचा आजवरचा इतिहात पाहता घराणेशाहीविना या पक्षांचे अस्तित्व शून्य असल्याचे दिसून येते. समाजवादी पक्ष, शिवसेनेसोबत राष्ट्रवादी काँग्रेसही त्याच माळेतला पक्ष. भलेही या पक्षाची दोन शकले झाली असली, तरी या माळेला एकत्रित गुंफण्याचे काम पवार कुटुंबातील व्यक्तीशिवाय दुसरी कुठलीही व्यक्ती करु शकत नाही हेदेखील वास्तव आहे. जसे काँग्रेसमध्ये गांधी घरण्यातील व्यक्तीच हायकमांड असते. अगदी तसेच. सध्या पक्षातील काही नेत्यांकडे अनेक सत्तापदे एकवटलेली आहेत. एकाच घरात खासदारकी, आमदारकी आणि मंत्रीपदही, त्यावरुन ज्येष्ठ नेत्यांमध्ये कुरबुरी सुरू आहे. त्यांना इतकी सत्तापदे तर मला काही नाही, मीदेखील पक्षासाठी इतकी वर्षे घासली आहेत? असे प्रश्न हे ज्येष्ठ नेते जाहीररित्या विचारत आहेत. परंतु हे प्रश्न विचारताना आपण व आपल्या कुटुंबातील सदस्यांनी किती वर्षे सत्ता उपभोगली याचा मात्र त्यांना विसर पडताना दिसतोय. या सर्यांच नेत्यांना सुनेत्रा पवार यांनी अप्रत्यक्षरित्या झापले. अजितदादांच्या निधनानंतर संक्रमणावस्थेतून जात असलेल्या राष्ट्रवादीत खरा हायकमांड कोण आहे हे सुनेत्रा पवारांनी दाखवून दिले आहे. आता या हायकमांडला पक्ष सुरळीत चालवायचा असेल तर सर्व नेतेमंडळींवर मजबूत कमांड ठेवावी लागणार आहे.

सिव्हिक सेन्स म्हणजे काय रे भाऊ?

सध्या जगभरात भारतीयांच्या अब्रूचे धिंडवडे काढले जात आहेत. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, एक्स यासारखे जेवढे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहेत त्यावर कोणीही येत आणि भारतीय नागरिकांची ऐशी तैशी करताना दिसत आहे. हे पाहताना आपल्याच तोंडात कोणी मारल्यासारखं फिल येतोय. कारण की सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले व्हिडिओ, फोटो, पोस्टमध्ये आपलीच माणस आहेत. किंबहुना ते तिकडे जो काही बेशिस्तपणा करत आहे तो तर आमच्याकडे सामान्य आहे. त्याला आम्ही कूल म्हणतो तर कधी गंमतही म्हणतो. बरं याच कूल होण्याच्या नादात व्हिएतनामच्या एअर पोर्टवर गंमत म्हणून भारतीयांनी गरब्याचा फेर काय धरला तर सगळ्या जगाने भारत आणि भारतीयांची लाज काढायलाच सुरुवात केलीये.



व्हिएतनाममधील हे प्रकरण ताज असतानाच बाली फिरायला गेलेल्या भारतीयांनी निघताना हॉटेलरुममधले ढापलेले टॉवेल, पांढऱ्याशुभ्र बेडशीट दहा बारा काटे चमचे, साबणाच्या वड्या, शॅम्पू कंडीशनर पाऊचचे व्हिडिओ हॉटेल बॉयने जगासमोर आणले. नेपाळ फिरायला गेलेल्या भारतीयांनी भूसख्खलन झालेल्या ठिकाणापासून बाजूलाच उभ्या असलेल्या बससमोर गरबा केला. गरबा तर आमचा स्ट्रेस बस्टर आहे.. .आणि जरा वेफर्स खाल्यानंतर त्याचे रिकामे पाकिट, प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या चॉकलेटचे रेपर भर रस्त्यात न फेकता एका बाजूला फेकले तर हॉटेलवाल्याने भारतीय पर्यटकांनाच ते उचलायला लावले. त्याचाही व्हिडिओ व्हायरल झाला. बरं जपानमध्ये एका भारतीय बाईने वस्तू ढापली. त्यावेळी तिला कोणा सुरक्षा रक्षकाने हटकले तर तिने त्याला आपल्याकडे देतात तशी चिरीमिरी देऊन गप्प राहायला सांगितले तर त्या बाबाने त्याचाही व्हिडिओ काढला ज्यामुळे भारतात लाच देणे आणि घेणे आणि मामला सेट करणे किती सोपं आहे जे आमच्या अंगवळणीच पडलंय ते जगाला कळालं. म्हणजे त्यावरून भारतात नक्की कामं कशी चालतात ते जगाला कळालं.

बरं ते कमी की काय थायलंडसारखा देश जो नेहमी भारतीयांचे आदरातिथ्य करतो तो ही आता इंडियनपासून लांब राहा, त्यांना एंटरटेन करू नका अशा सूचना स्थानिकांना करू लागलाय. त्यात भरीस भर म्हणजे भारतीय बिजनेसमन हर्ष गोयंका यांनी स्वित्झर्लंडमधील एका नामांकित हॉटेलने भारतीय पाहुण्यांसाठी प्रसिद्ध केलेली सूचनाच सोशल मीडियावर शेअर केली. त्यात भारतीयांसाठी खास सूचना देण्यात आल्या आहेत. जसे की हॉटेलमध्ये नाश्त्याच्या वेळेतच हजर रहा. तसेच उरलेले पदार्थ तुम्हाला सोबत नेता येणार नाहीत. त्यासाठी लंच बॅग आणू नका. जेवल्यानंतर उरलेलं जेवण तुम्हाला पार्सल करून दिले जाणार नाही. तसेच हॉटेलमध्ये जोरात बोलू नये. या साधारण वाटणाऱ्या पण मर्मावर लागणाऱ्या सूचना हॉटेल व्यवस्थापनाने खास भारतीयांसाठी जारी केल्यात.

बेशिस्त भारतीयांच्या विरोधात उठलेले हे वादळ जगभरात पसरत असून कॅनडात तर काही ठिकाणी तर भारतीय दिसताच त्यांना ट्रोल केलं जात आहे. तुमच्या देशात निघून जा, असे सांगून विदेशी व्यक्ती भारतीयांचा अपमान करण्याची एकही संधी सोडत नाहीयेत. पण एकाचवेळी संपूर्ण जग जर भारतीयांमध्ये सिव्हिक सेन्स नाही असं म्हणत निंदा नालस्ती करत असेल तर भारतीय नागरिक म्हणून आपल्यालाही यावर विचार करण्याची गरज आहे. कारण सिव्हिक सेन्स हा व्यक्तीमत्वाचा पाया आहे. पण जर तो पायाच रचला जात नसेल तर ही एक गंभीर गोष्ट आहे. ज्याचे पडसाद आज भारतीयांविरोधात जगभरात उमटत आहेत. हे जर असंच सुरू राहिलं तर जगातील सगळ्याच देशात भारतीयांना नो एन्ट्री जाहीर केली जाईल. मात्र त्यासाठी सिव्हिक सेन्सची बाराखडी आपल्याला गिरवावीच लागणार आहे.

हा सिव्हिक सेन्स म्हणजे सामाजिक नीतीनियमांचे पालन. म्हणजेच जबाबदार नागरिक जो समाजाप्रती, देशाप्रती, परिसराप्रती असलेल्या कायद्याचे, अटींचे, नियमांचे पालन करतो. सार्वजनिक ठिकाणी शिस्त राखतो. पण त्याचबरोबर इतरांच्या संवेदनांचा जो आदर करतो. याला आपण मॅनर्स असेही म्हणतो. सिव्हिक सेन्सचा आणि तुमच्या खिशात खुळखुळणाऱ्या पैशांचा काडीमात्रही संबंध नाही. यामुळे तुम्ही पैसेवाला असाल किंवा मध्यमवर्गीय तुमचा सिव्हिक सेन्स परदेशातच नाही तर तुमच्या घरात, प्रवासात, मैदानात,शाळा-कॉलेज, कामाच्या ठिकाणीही दिसून येतो. त्यावरूनच समोरचा तुमच्याबद्दल तुमच्या आई वडिलांबद्दल, व्यक्तीमत्वाबद्दल, तुमच्या देशाबद्दल तुमच्या जडणघडणीबद्दल विचार करतो. तुम्हाला जज करतो आणि त्यावरून तुम्हाला लेबल लावले जाते. बरं आता हा सिव्हिक सेन्स काही बाजारात मिळत नाही तर तो परदेशात घराघरात आणि शाळांमध्ये शिक्षकांकडून शिकवला जातो. आपल्याकडे तसा काही प्रकार दिसत नाही.

फार तर पालकमंडळी मुलांना शिस्तीच्या संस्काराच्या नावाखाली काही बर्या गोष्टी शिकवतात. कसं बोलायचं, कसं वागायचं, हे त्यात अधिक. पण विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या व्यक्ती मुलांना किंवा इतरांना सिव्हिक सेन्सबद्दल सांगत असतात त्या स्वतः किती तो अवलंबतात? हाच खरा प्रश्न आहे. त्यामुळे आपल्याकडे तशा कडक शिस्तीत कोणी सहसा वाढत नाही. परिणामी एखाद 5 वर्षाचं मूलं जसं एखाद्या गोष्टीसाठी एक्साईट होतं, आदळआपट करत गोंगाट, किंचाळून, दंगा करत. तीच एक्साईटमेंट 17 वर्षाच्या मुलामध्ये दिसते. ती वयोमानानुसार वाढतच जात. असेही जगात भारतीय लोकांना इमोशनल फूल असे म्हटलं जात. कारण आपल्याला कधीच भावना हाताळणं कोणी शिकवलेलचं नसतं. त्यामुळे आपल्याला राग आला तरी तो अति येतो, प्रेमाचं भरतं पण अति, द्वेष, मत्सरही अति एवढंच नाही तर आनंद व दुःखही तेवढेच अति होते. परिणामी या सगळ्या गोष्टींचा परिणाम व्यक्तीमत्वावर होतो. त्याचा परिणाम त्याच्या जवळील,आजूबाजूच्या सदस्यांवरही होतो. समाज असाच तर घडत जातो. याचचं प्रतिबिंब आपल्याला सणावेळी दिसतं. भारतीय म्हणजे उत्सवप्रेमी मग अशा सण उत्सवांमध्ये हा अतिपणा वेगवेगळ्या रुपात पाहायला मिळतो. कधी गणपती डान्समध्ये तो दिसतो. तर गरब्यात तो बेभान होतो.

कारण या सणांचं नातं थेट आमच्या भावनांशी आहे. यामुळे आनंदात असताना, चांगल्या मूडमध्ये असताना गरबा खेळणारे गणपती डान्स करणारे नग देशात पावला पावलावर दिसतात. आपण काहीतरी वेगळ करतोय. त्यातून आपल्याला आनंद मिळतोय शिवाय आपल्याला पाहणारे लोकही त्याचा आनंद घेताहेत या विचारात भारतीय अजून बे

पावसाळ्यात ताप व सर्दी-पडसं होऊ नये म्हणून काही खास घरगुती टिप्स !

हळदीचे दूध

हळदीच्या दुधाबद्दल तुम्ही सुद्धा एकून असालच. ताप आपल्यावर अनेक भागांत हमखास हळदीचे दुधच प्यायला दिले जाते. उन्हाळ्यात हळदीचे दूध कोणी फार पीत नाही पण पावसाळा आलं की ते पिण्यावर जास्त भर दिला जातो. कारण या काळात ताप, सर्दी खोकला यांपासून तुम्हाला आराम मिळवून देण्याचे काम हळदीचे दूध करते. असे म्हणतात एक या सर्व आजारांपासून बचाव करायचा असेल आणि हे आजार कधी होऊ नये असे वाटत असेल तर दिवसातून एकदा आवर्जून हळदीचे दूध प्यावे. एक लक्षात ठेवा एक ग्लास दुधामध्ये थोडीच हळद मिसळायची असते. पूर्ण एक चमचा भरून हळद टाकायची नसते.

गरम पाणी

तुम्ही अनेकांना हे म्हणताना ऐकलं असले की पावसाळ्यात फक्त गरम पाणीच प्यावं आणि हा सल्ला अतिशय मोलाचा आहे. पावसाळ्यात पाणी दुषित होण्याची शक्यता जास्त असते. याशिवाय अधिक थंड पाणी प्यायल्याने तुम्हाला ताप, सर्दी खोकला होण्याचा सुद्धा धोका असतो. म्हणून पावसाळ्यात शक्य तितके उकळून पाणी प्यावे. याशिवाय सर्दीमुळे नाक बंद झाले असल्यास आणि घसा खूप दुखत असल्यासही गरम पाणी उपयुक्त ठरते. या व्यतिरिक्त तुम्ही गरम पाण्यात विक्स किंवा पुदीना टाकून त्याची वाफ घेऊ शकता. याशिवाय जर इसेंशीयल ऑईल जसे की लवंगाचे तेल, टी-ट्री ऑईल, लेमन ग्रास ऑईल यांचे मिश्रण करून त्याची वाफ सुद्धा तुम्ही घेऊ शकता.

हंगामी तापाचे लक्षण

पावसाळ्यात होणाऱ्या तापाची काही खास लक्षणे असतात. आज आम्ही तुम्हाला त्यापैकीच काही ६ लक्षणे सांगणार आहोत. जर तुम्हाला यापैकी कोणतेही लक्षण आढळले तर तुम्ही आवर्जून उपचार घ्यावेत. श्वास घेण्यात अडचण, नाक बंद होणे, खोकला, अंगदुखी होणे, डोकेदुखी, स्नायुंमध्ये ताण निर्माण होणे यांसारखी लक्षणे दिसू लागल्यास तात्काळ घरगुती उपचार घ्यावे, जर त्रास वाढतच गेला तर अजिबात वेळ न दवडता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.


घरबसल्या पावसाळी तापापासून कसा बचाव करावा

घरबसल्या पावसाळी तापापासून स्वतःचा बचाव कसा करावा या विषयी सांगताना जाणकार सांगतात की जस जसा पावसाळा जवळ येतो तस तशी आपल्या शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याची गरज भासू लागते. कारण या काळात विषाणू आणि जंतू यांचा प्रभाव वाढतो आणि ते अधिक त्वेषाने आपल्या शरीरावर व आरोग्यावर हल्ला करू शकतात. अशावेळी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे संतुलित आणि स्वच्छ आहार घेणे, बाहेरचे न खाणे आणि गरम पाणी शक्य तितके जास्त पिणे. पाणीच तुमच्या शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी सर्वाधिक मदत करू शकते.

अजून काही खास घरगुती उपचार

जाणकारांच्या म्हणण्यानुसार, गरम पाण्यात पुदिन्याची पाने आणि ओवा मिश्रण करून त्याची वाफ घ्यावी. ही वाफ खोकला आणि सर्दीपासून आराम मिळवून देऊ शकते. याशिवाय पुदिना, ओवा, कापूर, निलगिरी मिक्स करून तयार केलेला आयुर्वेदिक लेप गळ्यातील खसखस, खोकला, जळजळ इत्यादी समस्या दूर करू शकतो. हा लेप सर्दी आणि तापाला सुद्धा दूर ठेवतो. हा लेप गरम पाण्यात मिसळून त्याची वाफ घ्यावी. लक्षात ठेवा पाणी गरम करायचे आहे उकळवायचे नाही आहे.

मटार कोफ्ता करी



साहीत्य :

- १ कप मटार
- १ लहान कांदा, बारीक चिरून
- १ टीस्पून आले पेस्ट
- १ टीस्पून मिरची पेस्ट
- १/२ टीस्पून जिरे
- १/४ कप कोथिंबीर
- ४ ते ५ टेस्पून बेसन
- १/४ कप बेदाणे
- चवीपुरते मीठ
- १ कप तेल कोफ्ते तळण्यासाठी

करीसाठी

- २ मध्यम कांदे
- २ मोठे टॉमेटो
- ५ ते ६ लसूण पाकळ्या, एकदम बारीक चिरून
- १ लहान तुकडा आले, बारीक चिरून
- ८ ते १० काजू
- १ टीस्पून लाल तिखट (करी तिखट हवी असल्यास अजून थोडे घालावे)
- १ टीस्पून कसूरी मेथी
- ४ टेस्पून तेल (टीप १ नक्की वाचा)
- अख्खा गरम मसाला - १ तमाल पत्र, २ वेलची, १ इंच दालचीनी, २-३ काळी मिरी, २ लवंग
- १ टीस्पून गरम मसाला
- १ टेस्पून धणेपूड
- १ टीस्पून जिरेपूड
- ३ टेस्पून क्रीम / फेटलेली साय
- २ टीस्पून साखर (ऐच्छिक)
- चवीपुरते मीठ

कृती :

- **कोफ्ते:** बेसन भाजून घ्यावे. मटार भरडसर वाटून घ्यावे. वाटलेल्या मटारात चिरलेला कांदा, कोथिंबीर, जिरे, आले-मिरची पेस्ट आणि चवीपुरते मीठ घालून मिक्स करावे. भाजलेले बेसन घालून मऊ गोळा भिजवावा. भिजवलेला गोळा १० समान भागात विभागून घ्यावा. एका भाग हातात घेउन चपटा करावा. मध्यभागी थोडे बेदाणे ठेवावे. सर्व बाजू बंद करून कोफ्ता बनवावा. शक्यतो चपटे कोफ्ते बनवावे म्हणजे आतपर्यंत शिजतील. अशाप्रकारे सर्व कोफ्ते बनवून घ्यावे. कढईत तेल गरम करावे. तेल गरम झाले की आच मंद करावी. एकावेळी ३ कोफ्ते घालून तळून घ्यावे.
- **करी:** कांद्याचे मोठे तुकडे करून मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्यावे. किंवा किसणीवर किसावे. टॉमेटो उकळत्या पाण्यात घालावे. ३-४ मिनिटे उकळवावे. साले काढून मिक्सरमध्ये वाटावे. काजूसुद्धा ५ मिनिटे उकळवून घ्यावे व अगदी थोडे पाणी वापरून पेस्ट करून घ्यावी.कढईत ३-४ टेस्पून तेल गरम करावे. त्यात अख्खा गरम मसाला घालावा. आलेलसूण घालावे. काही सेकंद परतून कांदा पेस्ट घालावी. मध्यम आचेवर कांदापेस्ट लालसर होईस्तोवर आणि तेल सुटेपर्यंत परतावे. कांदा पेस्ट व्यवस्थित परतली गेली पाहिजे. जर थोडीपण कच्चट राहिली तर ग्रेव्हीला उग्र दर्प येतो आणि चवीला जळजळीत लागते. कांदापेस्ट परतल्यावर त्यातील तमालपत्र आणि दालचीनी काढून टाकावी. टॉमेटो प्युरी आणि काजू पेस्ट घालावी. झाकण ठेवून मंद आचेवर शिजवावे. मध्येमध्ये तळापासून ढवळावे. टॉमेटोचा कच्चा वास जाईस्तोवर झाकण ठेवून शिजवावे. कडेने तेल सुटले की थोडे पाणी घालून कंसिस्टन्सी सारखी करावी. शेवटी लाल तिखट, कसूरी मेथी, गरम मसाला पावडर, धने-जिरेपूड, साखर आणि मीठ घालावे. २ मिनिटे उकळून घ्यावे.



वजन वाढण्याचे एक कारण सलॅड ही असू शकतं !

आपल्या वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जर आपण डायटिंग करत असाल आणि त्यासाठी सलॅडचे अधिक सेवन करत असाल तर सावध व्हा. कारण सॅलडनेही वजन वाढू शकतं. हे वाचून आपल्याला आश्चर्य वाटत असलं तरी हे खरं आहे.

तशी ही गोष्ट सर्व प्रकाराच्या सलॅडवर लागू होत नाही, परंतू अनेकदा आपण स्वादिष्ट आणि चटपटीत सलॅडचा मजा घेण्याच्या फिराकीत वजन वाढवता.

बाहेर जेवायला गेल्यावर आपण आपल्या आवडीचे मेयोनीज आणि क्रीमने भरपूर सलॅडची चव बघता आणि व्हेज सिझलरच्या नावावर भरपूर सॉसही सेवन करता. परंतू या प्रकाराचे सलॅड कॅलरीने भरपूर असतात आणि वजन कमी करण्याऐवजी वाढवू शकतात.

याव्यतिरिक्त अनेक रेस्टॉरन्टध्ये सर्व्ह करण्यात येर्णाया सलॅडची गार्निशिंगमध्ये असे पदार्थ वापरले जातात जे कॅलरीने भरपूर असतात आणि चव देण्यासह सपाट्याने आपले वजन वाढवण्यात हातभार लावतात. म्हणून सलॅडचे सेवन करताना ते फ्रेश, आणि विना कॅलरीयुक्त असावे याची काळजी घ्या.



स्किन अस्थमावर काय कराल उपाय?

स्किन अस्थमा हा एक इंफ्लामेट्री त्वचा विकार आहे. ज्यात शरीरात पुरळ येते, त्वचेवर खाज, रॅशेज येतात आणि पॅच तयार होता. या विकाराचं मुख्य लक्षण त्वचेवर खाज येणे हे आहे. या विकाराला एक्जिमा या नावानेही ओळखलं जातं. स्किन अस्थमावर स्पेशल असा उपचार नसल्याचं सांगितलं जातं, पण काही उपायांनी ही समस्या कमी केली जाऊ शकते. चला जाणून घेऊ या उपायांबाबत...

मॉइश्चराइज – स्किन अस्थमाच्या उपचारात नियमितपणे त्वचा मॉइश्चराइज करणं फार गरजेचं असतं. संक्रमण झालेल्या व्यक्तीने नॅच्युरल आणि ऑर्गेनिक मॉइश्चरायजरचा वापर करावा. कारण यात खाज आणणारे केमिकल्स किंवा सेंटेड केमिकल्स नसतात.

मृत पेशींची डागडुजी – ऑलिव्ह ऑइल, कोकोआ बटर, व्हर्जिन कोकोनट ऑइलसारख्या मॉइश्चरायजिंगने युक्त साबण, बाथ जेल आणि क्रीम लावा. कोरड्या त्वचेवर लॉरिक जेल आणि व्हर्जिन कोकोनट ऑइल अधिक फायदेशीर ठरतं. याने मृत पेशींना पुन्हा जिवंत केलं जातं.

एक्वस क्रीम – प्रभावित भागाला मॉइश्चराइज करण्यात एक्वस क्रीम मदत करते. त्वचेवर ही क्रीम लावावी. कोरड्या त्वचेवर असं क्रीम लावा ज्याने त्वचा मुलायम होईल.

खाज रोखणारे लोशन – खाज येत असलेल्या त्वचेसाठी काही लोशन तज्ज्ञांच्या सल्ल्याने तुम्ही वापरू शकता. स्वतःच्या मनाने किंवा कुणाच्या सांगण्यावरून कोणतही लोशन वापरू नका.

चांगला आहार – त्वचेची ॲलर्जी आणि सूज यांसारख्या समस्या दूर करण्यासाठी चांगला आहार घेणे महत्त्वाचे आहे. हिरव्या भाज्या, फळं, कडधान्ये आणि आवश्यक फॅटी ॲसिडचा डाएटमध्ये समावेश करावा. ॲंटी-ऑक्सिडेंट असलेल्या फळांचा अधिकाधिक समावेश करावा.

चमकदार, सुंदर आणि मजबूत केसांसाठी लिंबाचा 'असा' करा वापर

पावसाळ्यात जास्तीत जास्त लोकांना केसांच्या वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागतो. अनेकदा तर इतके कमजोर होतात की, मधून तुटूही लागतात. याचं कारण म्हणजे पावसाळ्यात केस भिजलेले राहणे आणि केसात कोंडात होणे. योग्य प्रमाणात सूर्यप्रकाश आणि हवा न मिळाल्याने केसात आरोग्य बिघडतं. जर तुम्हालाही ही समस्या होत असेल तर त्यासाठी आम्ही तुम्हाला एक सोपा घरगुती उपाय सांगत आहोत. तो उपाय म्हणजे लिंबू.

लिंबातील खास गुण फायदेशीर

लिंबू हे आरोग्यासाठी किती फायदेशीर असतं हे काही तुम्हाला वेगळं सांगायला नको. संक्रमणापासून बचाव करण्यासोबतच याने शरीराचं तापमान संतुलित ठेवण्यास मदत मिळते. शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी देखील डॉक्टर लिंबू पाणी सेवन करण्याचा सल्ला देतात. आरोग्यासोबतच लिंबू केसांसाठीही फायदेशीर ठरतं.

केसांसाठी कसं फायदेशीर?

लिंबाच्या रसात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असतात. याने डोक्यातली कोलेजनची निर्मिती वाढवून केसांचं आरोग्य चांगलं ठेवता येतं. तेच यातील ॲसिडमुळे डोक्याच्या त्वचेची चांगली स्वच्छताही होते आणि केसही मजबूत होतात. लिंबात सायट्रिक ॲसिड, मॅग्नेशिअम, कॅल्शिअम आमि फ्लानोएड तत्वही असतात. हे तत्व केसांची चांगली वाढ करतात. लिंबाचा रस तुम्ही केसांवर आणि केसांच्या मुळात लावू शकता. सोबतच इतर वेगळ्या पद्धतीने सुद्धा तुम्ही लिंबाचा रस केसात लावू शकता.

ऑयली केसांसाठी

जर तुमचे केस ऑयली असतील तर लिंबाचा रस केसांच्या मुळात लावा. यासाठी लिंबाचा रस एका वाटीत काढा आणि कापसाच्या मदतीने केसांच्या मुळात चांगल्याप्रकारे लावा. दोन मिनिटांसाठी हलक्या हाताने मसाज करा. १० मिनिटांनी केस शॅम्पूने धुवा. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

ड्राय केसांसाठी

ड्राय केसांसाठी वेगळ्या पद्धतीने लिंबाचा वापर करावा लागतो. ड्राय केस हे लवकर गळतात, त्यामुळे त्यांची काळजी घेताना काही गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. यासाठी अर्ध्या लिंबाच्या रसात १ मोठा चमचा खोबऱ्याचं तेल किंवा ॲलोव्हेरा जेल मिश्रित करा. हे केसांना लावा आणि १० मिनिटांने केस स्वच्छ करा. तुम्हाला हवं असेल तर यात तुम्ही मधही मिश्रित करू शकता.



टिप : वरील लेखातील सल्ले केवळ माहिती म्हणून देण्यात आले आहेत. यातील काही गोष्टींची कुणाला ॲलर्जी असू शकते. त्यामुळे तज्ञांच्या सल्ल्यानेच वरील उपाय ट्राय करा.



हे आहेत द्राक्षाचे आरोग्यदायी फायदे

फळे भाज्या आरोग्यासाठी उपयुक्त असतात. पण कोणत्या फळाचे नेमके काय फायदे आहेत, हे ठाऊक नसल्याने त्याचा योग्य वेळी फायदा घेता येत नाही. शरीराबरोबच मनाचे आरोग्य राखण्यास मदत करणारी द्राक्षे अनेकांना आवडतात. हिरव्या आणि काळ्या रंगात मिळणाऱ्या या फळाचे फायदे जाणून घेऊया...

मायग्रेनच्या त्रासावर गुणकारी – आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीत मायग्रेनची समस्या अत्यंत सामान्य आहे. अशावेळी द्राक्षांचा रस पिणे फायदेशीर ठरेल. नियमित रस घेण्याने मायग्रेनच्या त्रासावर नक्कीच फायदा होईल.

उच्च रक्तदाबावर फायदेशीर – उच्च रक्तदाबावर द्राक्ष खाणे रामबाण ठरेल. द्राक्षाने रक्तदाब नियंत्रित राहतो. उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी आठवड्यातून तीन-चार वेळा द्राक्षाचे सेवन करा त्याचा नक्कीच फायदा होईल.

कॅन्सरपासून प्रतिबंध होण्यासाठी – द्राक्षात ग्लूकोज, मॅग्नेशियम आणि सायट्रिक ॲसिड यांसारखे पोषकघटक असतात. त्यामुळे अनेक आजारांवर द्राक्ष खाणे लाभदायी ठरते. टीबी, कॅन्सर आणि ब्लड इंफेक्शन यांसारख्या आजारावर याचा विशेष फायदा होतो.

हृदयविकारावर उपयुक्त – जगभरात सर्वात जास्त मृत्यू हृदयविकारांमुळे आणि त्यासंबंधित इतर आजारांमुळे होतात. यासाठी द्राक्ष खाणे विशेष फायद्याचे ठरेल. अलीकडेच झालेल्या संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की, ब्रेस्ट कॅन्सरवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून द्राक्ष खाणे अत्यंत फायद्याचे ठरेल.

मधुमेहावर लाभदायी – द्राक्षाच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर यात लोहाचे अधिक प्रमाणात असल्याने लोहाचा एक उत्तम स्त्रोत आहे.

बद्धकोष्ठतेपासून सुटका – भूक लागत नसल्यास द्राक्षाचा रस पिणे फायदेशीर ठरेल. त्याचबरोबर त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होईल.

ॲनेमिया दूर करण्यासाठी – शरीरात रक्त कमी असल्यास एक ग्लास द्राक्षाच्या रसात २ चमचे मध घालून प्या. त्यामुळे ॲनेमिया दूर होण्यास मदत होईल. तसंच त्यामुळे येणारा थकवा कमी होऊन तरतरी येईल.



नियमित हळदीचं पाणी प्याल्यास मिळतील भरपूर लाभ

चरबी कमी होते.

चिंता आणि तणावाचा त्रास होतो कमी – चिंता, ताणतणावाची समस्या कमी करण्यासाठी हळदीचे सेवन करणं हा रामबाण उपाय आहे. हळदीमध्ये ॲंटी एंझायटी चे गुण आहेत. ज्यामुळे शारीरिक तसंच मानसिक ताणतणाव कमी होण्यास मदत मिळते. तसंच यातील ॲंटी-ऑक्सिडेंट चे गुणधर्म नैराश्य कमी करण्यास मदत करतात.

मासिक पाळी – काही महिलांना मासिक पाळीमध्ये प्रचंड त्रास होतो. मासिक पाळीत ओटी पोट, पाठ आणि पोटदुखीचा त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी तुम्ही हळदीचे पाणी किंवा हळदीचे दूध पिऊ शकता.

कधी प्यायचे हळदीचे पाणी?

जर तुम्हाला भरपूर प्रमाणात आरोग्यदायी लाभ हवे असतील तर रोज सकाळी रिकाम्या पोटी हळदीच्या पाण्याचे सेवन करा. सकाळच्या सुमारास या पाण्याचे सेवन करणं लाभदायक ठरते.

कसे तयार करायचे हळदीचे पाणी?

- एक ग्लास गरम पाणी घ्या आणि एका पॅनमध्ये ते उकळत ठेवा.
- या पाण्यामध्ये आता एक छोटा चमचा हळद पावडर टाका आणि चांगल्या प्रकारे पाणी ढवळत राहा.
- तुम्हाला हवे असल्यास यामध्ये मधाचा समावेश करू शकता.
- नियमित सकाळी हे पाणी तुम्ही पिऊ शकता.

गरम पाणी आणि हळदीचे फायदे

- हळदीमध्ये लिपोपोलीसॅचिरिड चे घटक आहेत. ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत मिळते. यामुळे ताप, सर्दी आणि खोकल्याचा त्रास कमी होतो.
- हळदीमुळे एखादी जखम देखील लवकर भरते.
- हळदीचे पाणी प्यायल्यास स्नायूंना मजबुती मिळते. ज्यामुळे सांधेदुखी आणि आर्थरायटिस यासारख्या आजारांचा धोका कमी होतो.
- कॅन्सर सारख्या गंभीर आजारापासून देखील आपलं संरक्षण होण्यास मदत मिळते.
- हळदीतील पोषण तत्त्वांमुळे खराब कोलेस्ट्रॉल देखील कमी होते.
- हळदीमध्ये ॲंटी इन्फ्लेमेटरी, ॲंटी ऑक्सिडेंट, ॲंटी- ट्यूमर, ॲंटी सेप्टिक, ॲंटी वायरल, कार्डियो प्रोटेक्टिव आणि किडनीसाठी पोषक असणारे औषधी गुणधर्म आहेत.
- तुम्ही वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करत असाल तर हळदीचे पाणी प्या. वजन घटण्यास नक्कीच मदत होईल.
- वजन वाढीमुळे हृदय रोग, स्ट्रोक आणि मधुमेह यासारख्या आजारांचा धोका वाढत राहतो.
- पण योग्य प्रमाणात हळदीचे पाणी प्यायल्यास पोट आणि ओटी पोटावरील चरबी कमी होईल.
- यामध्ये असणाऱ्या कर्क्युमिन घटकामुळे अतिरिक्त तपासत राहावे आणि ताप कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्ट्या डोक्यावर ठेवाव्यात. कोणतेही औषध बाळाला देण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला आवर्जून घ्यावा. बाळाला अधिक त्रास होऊ लागल्यस आणि ओळखीच्या डॉक्टरचाही फरक होत नसल्यास थेट इस्पितळात घेऊन जावे.

काही महत्त्वपूर्ण गोष्टी

बाळाला मलेरिया होऊ नये या दृष्टीने पालकांनीच खबरदारी घ्यावी. पावसाळा सुरु झाल्यास योग्य ती व्यवस्था करून बाळाची सोय बंद खोलीत करावी जेथे जास्त डास आत शिरणार नाहीत. जर तशी सोय नसेल तर डास आत येऊ नये म्हणून घराला त्या दृष्टीने व्यवस्था करावी. घराची आणि आसपासच्या परिसराची नियमितपणे सफाई करावी. बाळाला सतत गरम पाणी पाजावे. हे पाणी फक्त गरम केलेले नसावे, तर उकळून कोमट केलेले असावे. तुम्ही बाळाला जितके सुरक्षित ठेवू शकता तितके सुरक्षित ठेवण्यावर भर द्यावा.



लहान मुलांमध्ये मलेरियाची लक्षणे दिसताच करा 'हे' जालीम घरगुती उपाय!

लहान बाळांत आणि मुलांमध्ये मलेरिया कसा पसरतो?

प्लाज्मोडियम या परजीवी विषाणूमुळे मलेरिया होतो. भारतात प्लाज्मोडियम विवेक्स आणि प्लाज्मोडियम फॅल्किपरम या दोन प्रकारच्या डासांमुळे मलेरिया पसरतो. संक्रमित एनोफेलस मच्छराच्या चावण्याने मलेरिया पसरतो. जर गरोदरपणात मलेरियाची लागण झाली तर हा आजार बाळाला सुद्धा होऊ शकतो, ज्याला जन्मजात मलेरिया असे म्हणतात. जन्माच्या पहिल्या तीन महिन्यांत बाळाला मलेरिया होण्याचा धोका सर्वाधिक असतो. त्यामुळे गरोदरपणापासूनच स्वतःची आणि बाळाची मलेरियापासून सुरक्षा राखणे प्रत्येक स्त्री साठी गरजेचे असते.

मलेरियाची काय लक्षणं दिसतात?

बाळाला मलेरिया झाल्यास त्याला जास्त सुस्ती येते, तो खूप चिडचिड करतो, त्याला खूप थकवा जाणवतो. या शिवाय दुसरे लक्षण म्हणजे बाळाला अतिसार आणि उलटी वारंवार होते. याशिवाय त्याला खूप ताप येतो आणि सोबत थंडी सुद्धा वाजू लागते. हे मलेरियाचे मुख्य लक्षण आहे. मळमळ, कमी भूक लागणे यांसारख्य लक्षणांचा सुद्धा यात समावेश आहे. अनेक मुलांना मलेरियाची लागण झाल्यास पोटदुखीचा त्रास होतो. जर हि लक्षणे दिसू लागली तर बाळाला मलेरिया झाल्याची शक्यता जस्त असते. अशावेळी जास्त वेळ न घालवता त्वरित डॉक्टरांचे उपचार घ्यावेत.

मलेरियापासून बचाव

हा आजार डास चावल्याने होतो म्हणून बाळाला मच्छर, डास यांपासून दूर ठेवावे. घराच्या आसपास पाण्याच्या डबक्यात मलेरियाच्या डासांची पैदास होते. म्हणून घराच्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवावा. पावसाळ्यात घराच्या आसपास पाण्याची डबकी साचू नये याची विशेष काळजी घ्यावी. बाळाला फिक्या रंगाचे कपडे घालावे. गडद रंगांचे कपडे असल्यास त्याकडे डास लगेच आकर्षित होतात. मच्छर मारण्याच्या उत्पादनांचा वापर करावा आणि मॉस्किटो नेट बाळाभोवती लावावे. त्याच्या शरीरावर लेमनग्रास, सीट्रोनेला, लिंबू, लेव्हेंडर आणि युकेलीप्टीस सारख्या एसेंशीयल ऑईलची मालिश करावी.

मलेरियावर उपचार

मलेरियामुळे थकवा आणि कमजोरी येऊ शकते म्हणून बाळाला खूप आराम मिळेल याची काळजी घ्यावी. कोणत्याही आजाराशी लढायचे असेल तर पौष्टिक आहाराची गरज असते. हा पौष्टिक आहार बाळाला द्यावा. त्याचा ताप

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर महाराष्ट्रातील शाळा सोमवारपासून सुरू झाल्या. मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यभरात विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. कुठे औक्षण, गुलाबजाम, फुलांनी स्वागत, तर कुठे जंगल थीम आणि ट्रॅक्टर मिरवणुकीचे आयोजन केले होते. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय बनवण्यासाठी शिक्षकांनी विशेष तयारी केली होती, ज्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.

मोठ्या सुट्टीनंतर शाळांमध्ये पुन्हा किलबिलाट

औक्षण करत, गुलाबजाम भरवत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचं दणक्यात स्वागत

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

एप्रिल आणि मे महीना, असे तब्बल दोन महिने उन्हाळयाची सुट्टी मिळाल्यानंतर विदर्भ वगळता महाराष्ट्राती इतर भागातील शाळा (सोमवार 15 जून) सुरू झाल्या. उन्हाळ्याच्या सुट्टूयानंतर शाळेचा पहिला दिवस असून राज्यभरात उत्साहाचं वातावरण दिसून आले. मुंबई, पुणे, सातारा, नाशिक, अहिल्यानगर, परळी, रत्नागिरी अशा अनक ठिकाणी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचं दणक्यात स्वागत करण्यात आलं. कुठे विद्यार्थ्यांचं औक्षण, तर कुठे गुलाबजाम भरवून त्यांचं स्वागत झालं. साताऱ्यात तर चिमुरड्यांचे 'जंगी' स्वागत झालं. विविध वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांची ट्रॅक्टर ट्रॉलीतून मिरवणूक काढली तसेच ढोल-ताशांच्या गजराने शाळा आणि गाव दोन्ही दुमदुमलं. नाशिकच्या एका शालेत तर विद्यार्थ्यांसाठी खास जंगल थीम तयार करण्यात आली. जाणून घेऊया सविस्तर..

अहिल्यानगर - विद्यार्थी येण्यापूर्वी शाळा घासून, धुवून स्वच्छ

आज शाळेचा पहिला दिवस, उन्हाळ्याच्या सुट्टूया संपून आजपासून शाळा सुरू झाली. अहिल्यानगर जिल्ह्यातील खडकी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागताची तयारी पूर्ण झाली. शाळेतील शिक्षकांनी शाळा स्वच्छ धुऊन काढली तसेच शाळेचा परिसर देखील स्वच्छ केला गेला. विद्यार्थ्यांसाठी पाठ्यक्रमाची पुस्तक गणवेश शाळेमध्ये दाखल झाले. यावर्षी प्रशासनाकडून शाळेचा पहिली तासिका खेळाची घेण्याचा निर्णय घेण्यात आला. खडकी येथील शाळेत विद्यार्थ्यांची मिरवणूक काढून स्वागत केलं जाणार आहे विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांमध्ये देखील शाळा सुरू होत असल्याची उत्सुकता पाहायला मिळाले.

परळी - शाळेचा पहिला दिवस औक्षण, गुलाबजाम भरवत विद्यार्थ्यांचे स्वागत

उन्हाळ्याच्या सुट्टूयानंतर शाळेचा पहिला दिवस आहे आणि आज परळीत शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह दिसून आलाय. पहिल्याच दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत अनोख्या पद्धतीने करण्यात आले. आज पहिल्याच दिवशी शाळेकडून विद्यार्थ्यांचे औक्षण करत स्वागत करण्यात आलय.इतकंच नाही तर विद्यार्थ्यांना हातात फुल देऊन त्यांना गुलाबजाम देखील भरवण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट देखील करण्यात आला असून या स्वागताने विद्यार्थी भारावून गेलेले दिसून आले. पुन्हा एकदा शाळेमध्ये विद्यार्थ्यांची लगबग दिसून आलीये.

नाशिक - नवरचना विद्यालयात जंगल थीम

दीर्घ सुट्टीनंतर आज पासून नाशिक शहर आणि परिसरातील शाळा पुन्हा एकदा गजबजल्या आहेत. शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये कमालीचा



उत्साह आणि आनंद पाहायला मिळत आहे. विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिला दिवस सुखद आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी नाशिकमधील विविध शाळांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक शहरातील नवरचना विद्यालयात जंगल थीम तयार करण्यात आली शाळेचा पहिला दिवस सुखकर आनंदी व्हावा आणि पर्यावरण पूरक व्हावं यासाठी शाळेकडून विशेष आयोजन करण्यात आलं. येणाऱ्या विद्यार्थ्यांचं औक्षण करून शाळेत प्रवेश दिला जाणार आहे तर शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला फुल देऊन स्वागतही केलं गेलं. शाळेच्या परिसरामध्ये संपूर्ण जंगल थीम तयार करण्यात आली. यामध्ये विद्यार्थी शाळेत येत असताना गुहा तयार करण्यात आली आहे आणि यातून शाळेत येताना कंटाळा न येता आनंद व्हावा यासाठी प्रयोजन करण्यात आला.

पुणे - शाळेच्या वतीने नवीन विद्यार्थ्यांवर फुलांची उधळण , पुस्तक आणि खाऊ देऊन स्वागत

पुण्यातही उन्हाळी सुट्टूयाच्या प्रदिर्घ कालावधीनंतर शाळा सोमवारपासून सुरू झाल्या. शाळेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे. खूप दिवसानंतर मित्र-मैत्रिणींना आणि शिक्षकांना भेटल्यानंतर आज आनंद होत आहे अशी भावना विद्यार्थी व्यक्त करत आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेतील अंतराळ लॅब मध्ये लहान मुलांबरोबर हितगुज केलं.

मुंबई - चिमुरड्यांच्या स्वागतासाठी शिक्षक सज्ज

मोठ्या सुट्टी नंतर आज शाळेची पहिली घंटा आज वाजत असून चिमुरड्यांच्या स्वागतासाठी शिक्षक सज्ज झालेत. ग्रामीण भागाप्रमाणे मुंबई शहर व उपनगरांतील शाळा, तेथील शिक्षक लहान मुलांच्या स्वागतासाठी सज्ज आहेत. लहान मुलांच्या स्वागतासाठी शिक्षकांच्या वतीने गुलाबाची फुल आणि पेढे देऊन स्वागत केलं जात आहे.

रत्नागिरी - हजारो विद्यार्थ्यांचे आज 'पहिले पाऊल'

रत्नागिरी जिल्ह्यात 10 हजार 91 विद्यार्थ्यांचे आज 'पहिले पाऊल' पडणार आहे. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ला आजपासून उत्साहात सुरुवात झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाले. शाळांमध्ये 'विद्यारंभ' सोहळ्याचे उत्साही वातावरण आहे. चिपळूण तालुक्यातील १ हजार २१९ विद्यार्थ्यांनी पहिलीत प्रवेश केला आहे. त्यांचे फुलांनी स्वागत करण्यात येणार आहे, तसेच गोडधोड देण्यात येणार असून विविध उपक्रमही विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणार आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाने जिल्हाभरात आनंदाचे वातावरण होतं.

सातारा:जिल्हा परिषद शाळेच्या पहिल्याच दिवशी कोडोलीत चिमुरड्यांचे 'जंगी' स्वागत!

शाळेचा पहिला दिवस म्हटलं की, आई-बाबांचा हात धरून रडत-खडत शाळेच्या पायऱ्या चढणारी मुलं... हे दरवर्षीचे ठरलेले चित्र... मात्र सातारा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोडोली येथे आज या परंपरेला छेद देणारे एक अत्यंत उत्साही आणि अनोखे चित्र पाहायला मिळाले. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवख्या विद्यार्थ्यांचे ग्रामस्थ आणि शाळा प्रशासनाच्या वतीने अत्यंत जंगी स्वागत करण्यात आले.

विशेष म्हणजे या चिमुरड्यांना थेट सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये पारंपारिक वेशभूषेत बसवून संपूर्ण गावातून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी झालेल्या ढोल-ताशांच्या कडकडाटाने संपूर्ण कोडोली गाव दुमदुमून गेले होते. यावेळी मुख्याध्यापक अनिल जाईकर यांनी जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी पटवाढीच्या अनुषंगाने वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. याचाच हा भाग असून अशा राबवलेल्या उपक्रमामुळेच जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळलं.

दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना का मिळाली नाही पुस्तके... मोठं कारण समोर

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यातील बहुतांश शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षार्ला सुरुवात झाली असली तरी अनेक विद्यार्थ्यांच्या हाती अद्याप नवीन पाठ्यपुस्तके पोहोचलेली नाहीत. विशेषतः नव्या अभ्यासक्रमानुसार शिकणाऱ्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पुस्तकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेसमोर सुरुवातीलाच मोठे आव्हान उभे राहिले आहे. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

सहावीची पुस्तके अद्याप उपलब्ध नाहीत

यंदापासून राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत नवीन अभ्यासक्रम लागू केला जात आहे. त्यानुसार इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पुस्तकांमध्ये बदल करण्यात आला आहे. मात्र शाळा



नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसोबतच पाठ्यपुस्तकांचा वेळेवर पुरवठा होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सुरू होण्याच्या दिवसापर्यंत सहावीची नवीन पाठ्यपुस्तके अनेक ठिकाणी पोहोचलेली नाहीत. त्यामुळे शिक्षकांनाही अभ्यासक्रम शिकवताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सेतू पुस्तकांच्या आधारे अध्यापन

पाठ्यपुस्तके उपलब्ध होईपर्यंत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) यांनी तयार केलेल्या 'सेतू पुस्तकां'च्या आधारे विद्यार्थ्यांना शिकवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ही पुस्तके ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध आहेत. मात्र त्यांची छपाई करून वापरण्याची जबाबदारी शाळांवर आणि शिक्षकांवर येत असल्याने अतिरिक्त अडचणी निर्माण होत आहेत.

इतर माध्यमांच्या शाळांसमोर प्रश्न

एससीईआरटीची सेतू पुस्तके मुख्यतः मराठी माध्यमासाठी तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे हिंदी, इंग्रजी किंवा इतर माध्यमांच्या शाळांमधील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नेमके काय शिकवायचे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे शिक्षणातील एकसमानता आणि नियोजनाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

पुस्तक निर्मितीला उशीर का झाला?

शैक्षणिक क्षेत्रातील सूत्रांच्या माहितीनुसार, एकाच वेळी चार इयत्तांच्या नवीन अभ्यासक्रमाची पुस्तके तयार करण्याचे मोठे आव्हान बालभारतीसमोर होते. मराठी भाषेतील मूळ पुस्तके तयार होण्यास विलंब झाल्याने इतर भाषांतील अनुवाद आणि मुद्रण प्रक्रियेलाही फटका बसला. काही तांत्रिक आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळेही वितरण लांबले.

30 जूनपर्यंत वितरण पूर्ण करण्याचे लक्ष्य

बालभारतीने दुसरी, तिसरी आणि चौथीच्या बहुतांश पुस्तकांचे वितरण सुरू झाल्याचे स्पष्ट केले आहे. सहावीच्या मराठी माध्यमातील पुस्तकांचे मुद्रण पूर्ण झाले असून वितरण प्रक्रिया वेगाने सुरू आहे. 30 जूनपर्यंत सर्व विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तके पोहोचतील, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसोबतच पाठ्यपुस्तकांचा वेळेवर पुरवठा होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शाळेत सुरू होता नको तो प्रकार

ज्या वर्गात मुले शिकत होती, तिथेच सापडले रोख रक्कमेसह... साहित्य बघून पोलीसही अवाक



■मुंबई । प्रतिनिधी,

पश्चिम बंगालमधील उत्तर 24 परगणा जिल्ह्यातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, कंडोम आणि मद्याची बाटली सापडल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. या घटनेमुळे कांचरापारा येथील हार्नेट शाळा या शाळेच्या परिसरात नेमके काय सुरू होते, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार हे साहित्य शाळेतील एका खोलीत आढळून आले. विशेष बाब म्हणजे ही खोली अर्धवट सुसज्ज असून तिची मांडणी शयनकक्षाप्रमाणे करण्यात आल्याचे दिसून आले. खोलीतील या असामान्य व्यवस्थेमुळे संशय अधिकच बळावला असून स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

घटनेची माहिती समोर आल्यानंतर शाळा प्रशासनाने या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की, शाळेच्या परिसरात अशा प्रकारचे आक्षेपार्ह साहित्य किंवा रोख रक्कम असल्याची त्यांना कोणतीही माहिती नव्हती. तसेच या प्रकरणात शाळा व्यवस्थापनाचा कोणताही संबंध नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.



स्पा सेंटरच्या बंद दाराआड वेश्याव्यवसायाचं रॅकेट, आरोपींवर कारवाई अन्...

■मुंबई । प्रतिनिधी,

दिल्ली पोलिसांनी पहाडगंज परिसरातील एका स्पा सेंटरमध्ये सेक्स रॅकेट सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत महिलांना वाचवले. पोलिसांनुसार, मध्य दिल्लीमध्ये अनैतिक पद्धतीने करण्यात आलेली तस्करी आणि देह व्यापाराची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. आरोपीची पुष्टी केल्यानंतर पोलिसांनी एक विशेष पथक गठीत करून तपास सुरू केला.

पोलीस ग्राहक बनून स्पा सेंटरमध्ये

तपासादरम्यान पोलीस अधिकारी ग्राहक बनून स्पा सेंटरमध्ये पोहोचला. तिथे संबंधित पोलीस अधिकाऱ्यास पैसे देऊन वेश्याव्यवसायाची माहिती मिळाली. पोलिसांच्या माहितीनुसार, बनावट ग्राहक होऊन स्पा चालकाला पूर्वनियोजितपणे 1800 रुपये देण्यात आले. नंतर त्याची एका महिलेशी ओळख करून देण्यात आली होती.

पोलिसांनी स्पा सेंटरमध्ये छापा टाकला

माहितीच्या आधारे, पोलिसांच्या पथकाने स्पा सेंटरमध्ये छापा टाकला. तपासादरम्यान, वेश्याव्यवसायाचे पुरावे आढळून आले. नंतर पोलिसांनी स्पा चालवणाऱ्या 29 वर्षीय सैवेद उर्फ शब्बीरला अटक करण्यात आली.

संबंधित प्रकरणात तपासादरम्यान, पाच महिलांची सुटका करण्यात आली होती. पोलिसांनी त्यांची ओळख उघड केलेली नाही. पुढील प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणाची पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

बीडमध्ये अपघातात तरुणाचा मृत्यू, तपासात भलताच खुलासा

रात्री आला होता 'कार्यक्रम ओके' चा फोन... इन्स्टाग्रामने केला भांडाफोड

■बीड। प्रतिनिधी,

सात वर्षापूर्वी प्रेमातून जुळलेले नाते... संसारात वाढत गेलेले वाद... आणि पतीच्या जिवलग मित्रासोबत जुळलेले अनैतिक संबंध... या सगळ्याचा शेवट झाला तो एका थरारक हत्याकांडात. बीड जिल्ह्यात पत्नीने प्रियकराच्या मदतीने स्वतःच्या पतीची हत्या घडवून आणल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, हत्येनंतर अपघाताचा बनाव रचून गुन्हा दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र पोलिसांच्या कसून तपासामुळे या रक्तरंजित कटाचा पदार्फाश झाला.

रस्त्याच्या कडेला किरण सोनवणे रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्याच्या शेजारी पडलेली दुचाकी पाहून प्रथमदर्शनी हा अपघात असल्याचा संशय आला होता. मात्र, पोलिस तपासात समोर आलेले वास्तव अधिकच धक्कादायक आहे. किरणचा मृत्यू अपघातात नव्हे, तर गळा आवळून करण्यात आलेल्या हत्येमुळे झाला होता. या हत्येमागची मुख्य सूत्रधार ठरली ती त्याची पत्नी प्रियंका सोनवणे. सात वर्षांपूर्वी प्रेमविवाह केलेल्या या दाम्पत्यामध्ये वारंवार वाद होत होते. चार महिन्यांपूर्वी किरणचा मित्र दशरथ परदेशी



त्यांच्या संपर्कात आला. कौटुंबिक वादाची माहिती मिळाल्यानंतर प्रियंका आणि दशरथ यांच्यात जवळीक वाढली आणि त्याचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. याच काळात प्रियंकाने पतीचा कायमचा काटा काढण्याचा कट रचला. ठरल्याप्रमाणे प्रियंकाने किरणला घराबाहेर पाठवले. त्यानंतर दशरथ परदेशी आणि त्याचा साथीदार धीरज येडे यांनी किरणचा गळा आवळून खून केला. हत्येनंतर घटनास्थळी दुचाकी टाकून अपघाताचा बनाव रचण्यात आला आणि आरोपी तेथून पसार झाले.

किरण बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला. विशेष म्हणजे, या शोधमोहीमेत पत्नी प्रियंकाही सक्रियपणे सहभागी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे सुरुवातीला तिच्यावर कोणालाही संशय आला नाही. मात्र पोलिसांच्या तांत्रिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली. किरण बेपत्ता असताना प्रियंका आणि दशरथ परदेशी यांच्यात रात्रभर सोशल मीडियाद्वारे सातत्याने संपर्क सुरू असल्याचे उघड झाले. त्याचवेळी दशरथ परदेशी आणि त्याचा मित्र धीरज येडे हे दोघेही अचानक गायब असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि लोकेशन ट्रॅकिंगच्या मदतीने दोघांचा शोध घेतला आणि त्यांना पनवेल येथून ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. प्रियंकाच्या सांगण्यावरूनच हत्या केल्याचे निष्पन्न झाले. या उघडकीनंतर संपूर्ण बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून तिन्ही आरोपी सध्या नेकनूर पोलिसांच्या कोठडीत आहेत.

प्रेम, संशय, विश्वासघात आणि सूड या भावनांमधून घडलेल्या या हत्याकांडाने पुन्हा एकदा बीड जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. गेल्या काही काळात खून, दरोडे, मारहाण आणि गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, गुन्हेगारांमध्ये पोलिसांविषयीचा धाक कमी होत चालल्यामुळे अशा घटनांना खतपाणी मिळत आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी बीडसाठी स्वतंत्र स्पेशल टास्क फोर्स स्थापन करण्याची मागणी पुढे येत आहे.



गर्लफ्रेंडच्या नादात नराधम झाला वेडा

पोटच्या जुळ्या मुलींसह आणखी एका लेकीसोबत क्रूर कृत्य

■मुंबई । प्रतिनिधी,

एका 45 वर्षीय पित्याने सोमवारी पहाटेच्या सुमारास आपल्या तीन निष्पाप मुलींची धारदार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या केली. मृतांमध्ये 12 वर्षांची पल्लवी कुमारी आणि 6 वर्षांच्या जुळ्या बहिणी रिद्धि व सिद्धि यांचा समावेश आहे. पहाटेच्या वेळी जेव्हा सर्वजण गाढ झोपेत होते, तेव्हा या नराधमाने अत्यंत क्रूरतेने मुलींवर हल्ला केला, ज्यामध्ये तिन्ही मुलींचा जागीच दुर्दैवी अंत झाला. नंदू यादव ऊर्फ नंदकिशोर यादव असं आरोपी बापाचं नाव आहे.

जुळ्या बहिणींसह आणखी एक मुलगी रक्ताच्या थारोळ्यात

या थरारक घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. मुलींच्या किंकाळ्या ऐकून नंदू यादव याची पत्नी राधा देवी हिची जाग झाली. तिने आपल्या डोळ्यासमोर मुलींना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहिले. त्यानंतर उन्मादी झालेल्या नंदूने आपल्या पत्नीवर आणि लहान मुलावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखून राधा देवी यांनी आपल्या मुलाला कडेवर घेतले आणि जीव वाचवण्यासाठी घरच्या बाहेर धाव घेतली. त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने स्वतःचा आणि मुलाचा जीव वाचवला. या घटनेमुळे गावामध्ये भीतीचे आणि दुःखाचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नंदू यादव याचे दुसऱ्या गावातील एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते. याच कारणामुळे गेल्या अनेक दिवसांपासून पती-पत्नीमध्ये वारंवार वाद आणि मारहाण होत होती. सोमवारी पहाटेही याच विषयावरून घरात जोरदार भांडण झाले होते आणि त्यानंतर काही वेळातच या नराधमाने संतापाच्या भरात मुलींचा बळी घेतला. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी नंदू यादवला पोलिसांनी घेराव घालून अटक केली आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी घटनास्थळावरून हत्येसाठी वापरलेले शस्त्र जप्त केले असून, फॉरेन्सिक टीमद्वारे पुरावे गोळा करण्यात आले आहेत. मृतांचे शवविच्छेदन करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे एक विशेष मेडिकल बोर्ड नेमण्यात आले आहे. जिल्हा पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, कौटुंबिक कलहाच्या पलीकडे जाऊन आरोपीची मानसिक स्थिती देखील तपासली जात आहे. या तिहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण गिरिडीह जिल्हा हादरला असून, नराधम पित्याला फाशीची शिक्षा व्हावी, अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. ही घटना झारखंडमधील गिरिडीह जिल्ह्यातील मुफस्सिल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहनपूर पंचायत येथील तुरुकडीहा गावात घडली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com